उपवासाच्या सर्व प्रकारच्या पदार्थासाठी ग्राहकांची प्रथम पसंती...
सर्वोत्कृष्ट प्रतिचा, स्वच्छ व चविष्ट
VEGETARIAN
राजमोती साबुदाना
सर्वत्र उपलब्ध
1 Kg | 500 gm | 250 gm • इन्स्टंट साबुदाना सुद्धा उपलब्ध !

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

स्पेशल OFFER
STOCK CLEARANCE
ONLY ON SELECTED RANGE
20 - 50 % DISCOUNT
जरीवाला
कापड बाजार,अहमदनगर
यशोदानगर, पाईपलाईन रोड ,अ.नगर

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर,गुरुवार दि. ३०.०१.२०२५ | अंक नं. २७९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# कुंभमेळ्यासाठी गेलेले नगरचे भाविक अडकले प्रयागराजमध्ये

### अन्न पाण्याचीही व्यवस्था होईना, प्रशासनाला केले मदतीचे आवाहन

नगर – कुंभमेळ्यात मौनी अमावास्येनिमित्तच्या शाही स्नानासाठी प्रयागराज येथे गेलेले नगरमधील १५० भाविक गेल्या अनेक तासांपासून तेथील प्रचंड मोठ्या वाहतूक कोंडीत अडकलेले असून त्यांच्याजवळील अन्न व पाणी संपले असल्याने आणि त्या परिसरात कुठेही अन्न, पाणी उपलब्ध होत नसल्याने त्यांनी मोबाईलद्वारे प्रशासनाला मदतीचे आवाहन केले आहे.

नगर तालुक्यातील जखणगावचे सरपंच डॉ. सुनील गंधे यांनी नगरमधील अनेकांना तेथील विदारक परिस्थितीचे व्हिडीओ सोशल मिडियाद्वारे पाठवून जिल्हा प्रशासनाला याबाबत अवगत करत मदत मिळवून देण्याचे आवाहन केले आहे. सरपंच डॉ. गंधे यांनी सांगितले की, जखणगाव व परिसरातील १५० भाविक खाजगी आरामबसने २६ जानेवारीला नगरहून प्रयागराजकडे रवाना झाले होते. २९ जानेवारीला मौनी अमावस्येनिमित्त शाही स्नानासाठी प्रयागराजमध्ये १० कोटी भाविक जमा झाले. तेथे चेंगराचेंगरीची दुर्घटना होवून काही भाविक मृत्युमुखी पडले. मात्र नगरचे भाविक सुखरूप आहेत. त्यांनी शाही स्नानाचा लाभही घेतला.





प्रयागराज येथे वाहतूक कोंडीत अडकलेल्या नगरच्या भाविकांना मदत मिळवून देण्याबाबत जिल्हाधिकारी डॉ.सिद्धाराम सालीमठ यांना निवेदन देताना माजी महापौर भगवान फुलसौंदर व किशोर गांधी.

रात्री १२ च्या सुमारास ते सर्व भाविक अयोध्येकडे निघाले मात्र प्रयागराजमध्ये एवढ्या मोठ्या संख्येने भाविक आलेले असताना तेथील प्रशासनाने भाविकांच्या सोयी, सुविधांकडे व्यवस्थित लक्ष दिलेले नाही. पार्किंग व्यवस्थेमध्ये सुद्धा अस्ताव्यस्तपणा व अनियमितता दिसून आली. परिणामी तेथे सध्या मोठी वाहतूक कोंडी होवून लाखो भाविक त्यात अडकून पडले आहेत. नगरच्या भाविकांची गाडीही रात्री १२ वाजल्यापासून ३० जानेवारीला दुपारपर्यंत एकाच जागेवर उभी आहे. दुर्दैवाने या परिसरात कुठल्याही हॉटेल किंवा रेस्टॉरंट किंवा छोटी टपरी किंवा साधी पाण्याची व्यवस्था नाही. सुमारे एक लाखापेक्षा जास्त पब्लिक या लोकेशनवर ट्रॅफिक जाममध्ये आपल्या गाडीत बसून आहेत.

### भाविकांवर उपासमारीची वेळ

या भाविकांना कोणी सहकार्य करण्यापेक्षा संधी साधत असून, पाण्याची बाटली ५० रुपयाला तसेच इतर छोटे-छोट्या गोष्टीतही भाविकांची लूट करत आहेत. जवळपास ५ किलोमीटरपर्यंत कुठेही अन्न, पाण्याची व्यवस्था नाही. त्यामुळे लाखो भाविकांची उपासमार होत आहे. वाहनांची झालेली गर्दी आणि वाहतूक कोंडी पाहता कदाचित दोन दिवस एकाच ठिकाणी अडकून पडण्याची भाविकांवर वेळ येण्याची शक्यता आहे. तसेच अन्न पाण्यावाचून भाविकांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. प्रशासनाला आणि सरकारला विनंती आहे की, किमान या वाहतूक कोंडीत अडकलेले जे भाविक आहेत, त्यांच्या अन्न, पाण्याची व्यवस्था तातडीने करावी अन्यथा कालच्या दुर्घटनेत सुदैवाने वाचलेल्या भाविकांना अन्न, पाण्यावाचून जीव सोडण्याची वेळ येवू शकते, असेही डॉ.गंधे यांनी या व्हिडीओद्वारे म्हटले आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांनी प्रयागराजच्या प्रशासनाशी साधला संपर्क

डॉ.सुनिल गंधे यांनी सोशल मिडीयावर केलेल्या मदतीच्या आवाहनानंतर माजी महापौर भगवान फुलसौंदर, किशोर गांधी यांनी जिल्हाधिकारी डॉ.सिद्धाराम सालीमठ यांची भेट घेत नगरच्या भाविकांना मदत मिळवून देण्याबाबत निवेदन देवून चर्चा केली. घटनेचे गांभीर्य ओळखून जिल्हाधिकारी सालीमठ यांनी प्रयागराज येथील प्रशासनाशी संपर्क साधत नगरच्या भाविकांना मदत मिळवून देण्याची विनंती केली असून, ते सातत्याने याबाबत तेथील प्रशासनाच्या संपर्कात असल्याचे भगवान फुलसौंदर यांनी सांगितले.

उच्च दर्जा... योग्य किंमत...
हिच आपली खासीयत
Up to 14 Years Warranty
Hettich HÄFELE GRASS blum ITALICA ebco
SINCE 1972
NEW BOMBAY
KITCHENS & WARDROBE
अहिल्यानगर : एक्सल आर्केड, एच.डी.एफ.सी. बँक जवळ, लालटाकी.
पुणे : १, पाटील प्लाझा, मित्र मंडळ चौक.
मो.: 98909 85601 & 98222 94670.



नगरमध्ये पक्की अतिक्रमणे जेसीबीच्या सहाय्याने काढताना महापालिकेचे पथक. (छाया – बबलू शेख)

## नगरमधील पक्की अतिक्रमणे हटविली

### मोठ्या पोलिस बंदोबस्तात मनपाने राबविली मोहीम, रस्ता रुंदीकरणातील अडथळे दूर

नगर – काटवन खंडोबा रस्त्यावरील पक्की अतिक्रमणे महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने ३० जानेवारीला मोठ्या पोलिस बंदोबस्तात हटविली आहेत. त्यामुळे या रस्त्याच्या रुंदीकरणातील अडथळे दूर झाले असून रस्त्याच्या कामाला आता वेग येणार आहे.

मध्य शहराला रेल्वे स्टेशन परिसराशी जोडणारा काटवन खंडोबा रस्त्याचे काम महापालिकेने सुरु केलेले आहे. मात्र या कामात रस्त्याच्या कडेला असलेली अतिक्रमणे अडथळा ठरत होती. त्यामुळे आयुक्त यशवंत डांगे यांच्या आदेशानुसार अतिक्रमण विरोधी पथकाने मोठ्या पोलिस बंदोबस्तात अतिक्रमणे हटविण्याची मोहीम राबविली. अतिक्रमण विभाग प्रमुख आदित्य बल्लाळ, उपअभियंता सुरेश इथापे, प्रभाग अधिकारी राकेश कोतकर, क्षेत्रीय अधिकारी रिजवान शेख, क्षेत्रीय अधिकारी नितीन इंगळे, राहुल तनपुरे, दत्ता जाधव यांच्या सह नगर रचना विभाग, अतिक्रमण विरोधी पथक, बांधकाम विभाग, इलेक्ट्रिक विभाग यामधील अधिकारी, कर्मचारी या मोहिमेत सहभागी झाले होते. यावेळी कोतवाली पोलिसांनी बंदोबस्त ठेवला होता.

या रस्त्याच्या कडेला असलेली झोपडपट्टी तसेच इतर पक्के बांधकाम व पत्र्यांचे शेड आदी रस्त्याच्या कामाला अडथळा असणारे अतिक्रमणे हटविण्यात आली. दुपारी उशिरापर्यंत ही मोहीम सुरु होती.

सदर अतिक्रमणांमुळे या रस्त्याचे काम रखडले होते. महापालिकेच्या वतीने अतिक्रमण धारकांना या पूर्वी अनेकदा नोटीसा देवून अतिक्रमणे स्वताहून काढून घेण्याबाबत सूचना दिल्या होत्या. मात्र तरीही त्यांनी अतिक्रमणे न काढल्याने महापालिकेच्या वतीने जेसीबीच्या सहाय्याने ही अतिक्रमणे काढण्यात आली असून त्यामुळे आता रस्त्याच्या कामाला वेग येणार आहे. पावसाळ्यापूर्वी या रस्त्याचे काम आता पूर्ण होऊ शकेल असे अभियंता सुरेश इथापे यांनी सांगितले.

ADMISSION OPEN 2025-26
Nursery LKG UKG
Class I^st To IV^th
● Trained, Experienced, Dedicated & Caring Staff.
● Smart Class (Education Through Computer)
● CCTV monitored centre. ● Motivational Lectures.
● Modern Playground Equipments.
Hind Seva Mandal's
MEHER ENGLISH SCHOOL AND CARE & EDUCATION PRE-PRIMARY SCHOOL
Patwardhan Chowk, Anandi Bajar, Ahilyanagar 414 001.
Contact : 0241 - 2325328 | Mobile : 8956627925
Principal
Anurita Zagade

आता प्रत्येक शुक्रवार व शनिवार
मोफत तपासणी उपचार
रुग्णांच्या व्याधी कमी करण्या करिता नोबल हॉस्पिटल परिवारातर्फे अनोखी आरोग्य योजना...
दर शुक्रवारी
मुत्रविकार व किडनीविकार तज्ञ, शल्यचिकित्सक
डॉ. अमेय सांगळे
(किडनी व मूत्रविकार तज्ञ)
MBBS, M.S. (General Surgery), Mch (Urosurgery)
यांची मोफत ओपीडी
दर शनिवारी
इतर विविध व्याधींवर उपचारा करीता खालील तज्ञ उपलब्ध
डॉ. राघव पारगांवकर
(मेंदू व मणके विकार सर्जन)
MS Gen. Surgery, Mch Neuro Surgery
डॉ. अद्वैत गिते
(मेंदू विकार तज्ञ)
MD Medicine, DM Neurology
डॉ. सुशांत घुमरे
(जॉईंट रिप्लेसमेंट सर्जन)
MBBS, MS, (Ortho), DNB (Ortho), MNAMS
डॉ. प्रिती थोरात
(नेत्रविकार तज्ञ)
MBBS, DOMS, IOC
डॉ. यमिता साखरे-जाधव
(किडनी विकार तज्ञ)
MBBS, MD (Medicine), DNB Nephrology)
* अत्याधुनिक उपचार सुविधा * ह्रदयरोग विभाग * मेंदू विकार निदान व शस्त्रक्रिया विभाग
* किडनी व मूत्र विकार उपचार विभाग * पोट व आतडे विकार आणि जनरल सर्जरी विभाग
* अस्थिरोग, जॉईंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया विभाग * नेत्ररोग उपचार व शस्त्रक्रिया विभाग
* पुर्णवेळ अतिदक्षता विभाग तज्ञ उपलब्ध
अत्यंत अद्ययावत सेवा सुविधा
सर्व प्रमुख कंपन्यांसाठी कॅशलेस सुविधा
नगर जिल्ह्यातील सर्वप्रथम, प्रशस्त व परिपूर्ण आरोग्य मंदिर
एशियन नोबल हॉस्पिटल प्रा लि.
प्रेमदान चौक, मनमाड रोड, अहिल्यानगर
0241 - 2421290-91-92, 0241 - 2421911-12-13
मोफत उपचार अधिक माहितीसाठी संपर्क : 86055 52266

महाराष्ट्रातील सर्वात स्वस्त मॉल महावीर मॉल
अहमदाबादचे
कॉटन शर्ट ३०००/-रु. किंमतीचे
१२००/-रुपयात
३ शर्ट साईझ M to 4 Xl
१ ते १५ वर्षापर्यंत चे मुलांचे ३ टी शर्ट किंवा शर्ट ५००/-रु.ज्यांची मूळ किं.१२०० ते १५०० आहे.
सियाराम पॅन्ट पीस शर्ट पीस जोडी ३९९/- रु.
साडी आणि कूर्ती पँट सेटवर २०% सूट
मार्केट पेक्षा वेगळ पाहिजे तर मार्केट पेक्षा वेगळ्या ठिकाणी यावे लागेल.
अधिक माहितीसाठी भेट द्या..
श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

क्षणो क्षणी आमच्या मनी तुमचीच आहे आठवण
हीच आमच्या आयुष्यातील अनमोल साठवण...
कै. सुदाम सहादू कळमकर
!! प्रथम पुण्यस्मरण !!
शुक्रवार दि.३१/०१/२०२५ रोजी
स्थळ: नेहरु चौक, भिंगार, अहिल्यानगर
भोजन वेळ: दुपारी १२:०० वाजता
भावपुर्ण श्रध्दांजली
!! शोकांकुल !!
श्री. मधूकर सुदाम कळमकर (मुलगा) | श्री. महेश सुदाम कळमकर (मुलगा)
श्री. शेखर सुदाम कळमकर (मुलगा) | सौ. मंगल गंगाधर रासकर (मुलगी)
श्री. गंगाधर रासकर (जावई) | श्री. हेमंत महेश कळमकर (नातु)
चि. ओंकार महेश कळमकर (नातु) | चि. श्रेयश शेखर कळमकर (नातु)
कु. सिध्दी शेखर कळमकर (नात) | चि. श्रीयांश हेमंत कळमकर (पणतु)
समस्त कळमकर परिवार

Mount Litera Zee School
NURTURING POTENTIAL, UNLEASHING BRILLIANCE.
CBSE AFFILIATION NO 1130870
Admissions open 2025-26
Daund Road, Arangaon,Ahilyanagar 414006
FUTURE READY SCHOOL
माऊंट लिटेरा झी स्कूल अरणगांव, दौंड रोड, अहिल्यानगर
8263063744 / 7038730387
नर्सरी ते दहावी पर्यंत दर्जेदार शिक्षण प्रणाली

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## प्रचंड खटले... निकालात अडकले




सध्या देशात सुमारे ५ कोटी ९ लाखापेक्षा अधिक खटले निकालाच्या, न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. अनेक प्रकारच्या चर्चा, आश्वासने देऊनही तसेच काही पातळीवर सुधारणा होऊनही पेंडींग खटल्यांची समस्या कायम आहे. या खटल्यांचे निराकरण करण्यासाठी आपली न्यायालये सातत्याने, हरकोशीश प्रयत्न करत आहेत. तारखांवर तारखांची परंपरा कमी करण्यात येत आहे. तंत्रज्ञानाचा वापर व एकूण प्रणाली पारदर्शक होत आहे. तरीपण प्रचंड खटले अजूनही निकालात अडकले!

केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन मेघवाल यांनी अलीकडेच दिलेल्या माहितीनुसार केवळ चेक बाऊन्सचीच ४५ लाखाहून अधिक प्रकरणे विविध न्यायालयांत प्रलंबित पडलेत. एकूण प्रलंबित खटल्यांपैकी तब्बल १ लाख ८० हजार प्रकरणे ३० वर्षांहून अधिक काळ प्रलंबित आहेत.





ग्राहक न्यायालये, किशोरवयीन मुलांबाबत खटले चालवणारी न्यायालये, कौटुंबिक न्यायालये ही न्यायालये या प्रलंबित खटल्यांचा भार कमी करण्याचा प्रयत्न करतात.

सर्व वकील बंधू-भगिनी, मा. न्यायाधीश, वादी प्रतिवादी यासह संबंधित समुपदेशक, तज्ञ अभ्यासकांनी एकमेकांना सहकार्य केल्यास बरीच मोठी मजल मारता येईल. किमान वाहतूक नियम, चेक बाऊन्स, किरकोळ मारामाऱ्या, हल्ले, तक्रारी या खटल्यांच्या निकालांना वेग येईल. न्यायाधीश व कोर्टाची संख्याही वाढवणे आवश्यक आहे.

# एमआयडीसीमध्ये गुन्हेगारी, अवैध धंदे टपऱ्यांचे अतिक्रमण

### कामगारांमध्ये दहशतीचे वातावरण; प्रश्न सोडवा : आमी संघटनेच्या माध्यमातून उद्योजकांची जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षकांशी चर्चा



एमआयडीसी मधील विविध प्रश्न, गुन्हेगारी व अवैध धंदे बंद होण्यासाठी आमीच्या पुढाकारातून जिल्हाधिकारी सिध्दराम सालीमठ व जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्याशी उद्योजकांची संयुक्त बैठक पार पडली.

नगर - एमआयडीसी मधील विविध प्रश्न, गुन्हेगारी व अवैध धंदे बंद होण्यासाठी आमीच्या पुढाकारातून जिल्हाधिकारी सिध्दराम सालीमठ व जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्याशी उद्योजकांची संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीत उद्योजकांनी एमआयडीसीत वाढती गुन्हेगारी, अवैध धंदे बंद होण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी केली. तर अवैध धंदे चालविणाऱ्या टपऱ्यांचे अतिक्रमण हटविण्याची मागणी लावून धरली.


एमआयडीसीमध्ये अवैध धंदे चालविणारे अनाधिकृत टपऱ्या वाढल्या असताना गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. या टपऱ्यांमध्ये दारू, चरस, गांजा, अफू असे अमली पदार्थ विकले जातात. त्याचे सेवन करून गुन्हेगारीचे प्रमाण या परिसरात वाढत आहे. यामुळे एम आयडीसी मधील कामगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असल्याचा उद्योजकांनी प्रश्न उपस्थित केला. सन फार्मा-निंबळक रस्ता काम पूर्ण करावे, अहिल्यानगर औद्योगिक वाढीसाठी नवीन मोठे उद्योग (पॅरेंट कंपन्या) आणणे, पंपिंग स्टेशन ते एमआयडीसी नवीन पाईप लाईन टाकणे, ग्रामपंचायत टॅक्स हा एमआयडीसी कडे वर्ग करावा, टॅक्स आकारणी कंपनीच्या बीबीसी प्रमाणे आकारण्यात यावी, एम ब्लॉक मध्ये रस्त्यावरील कचऱ्यामुळे पसरलेली दुर्गंधी, महावितरणचे नवीन सबस्टेशन उभारण्यासाठी एमआयडीसी क्षेत्रात जागा मिळावी, एल ब्लॉक येथे पोलीस चौकी उभारावी, त्याचप्रमाणे महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आमीचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ यांनी मांडला.

जिल्हाधिकारी सालीमठ म्हणाले की, एमआयडीसी मधील उद्योजक हा नगर शहराचा अर्थिक कणा आहे. त्यांच्या माध्यमातून लोकांना रोजगार मिळतो. नुकत्याच मुख्यमंत्री यांनी दावस येथे झालेल्या मिटिंगमध्ये आपल्या जिल्ह्यासाठी पाच ते सहा हजार कोटी रुपये आणले आहेत. महिन्यातून एकदा झूम मीटिंग करून आपल्या छोट्या मोठ्या समस्या सोडवण्यास मदत होईल. कंपन्यामध्ये वेगवेगळ्या अधिकारी चेकिंगसाठी येतात. त्यासाठी एक सिंगल विंडो सिस्टीम राबवू शकतो. एमआयडीसीचा विकास होण्यासाठी आपल्या सगळ्यांना सोबत जावे लागणार असल्याचे स्पष्ट केले.

तर आपल्या जवळील असणारे शहर पुढे निघून गेले आहेत. परंतु आपण हा विचार करत नाही की आपल्या मध्ये काय कमतरता आहे. ते शोधावे लागेल. त्याचप्रमाणे सरकार सर्व गोष्टी आपल्याला पुरवू शकत नाही. त्यासाठी आपल्याला प्रयत्न करावे लागतील. इंडस्ट्रीसाठी पोषक, भयमुक्त वातावरण तयार करण्याचा आपण प्रयत्न करत आहोत. आपण सांगितल्याप्रमाणे सनफार्मा ते सह्याद्री चौक या ठिकाणी भाजी मार्केट भरतो. तो खूप मोठ्या प्रमाणात आहे. यामुळे अपघात होऊ शकतो लवकरात लवकर तो प्रश्न मार्गी लावण्यात येईल या सर्व विषयावर विभागस्तरीय एक बैठक बोलवून प्रश्न सोडवण्यात येतील. एमआयडीसी मधील उद्योजकांच्या तक्रारी सकारात्मक रित्या घेतल्या जातील, असे त्यांनी आश्वासन दिले.

जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यानी एमआयडीसी मधील चोरी, खंडणी, धमकी हा गंभीर प्रश्न आहे. सर्वात प्रथम उद्योजकांनी जो कोणी गुन्हेगार आहे, त्याच्या विरोध पोलीस ठाण्यात तक्रार दिली पाहिजे. गुन्हेगार पकडण्यासाठी तक्रार करणे गरजेचे आहे. गुन्हेगारी रोखण्यासाठी उद्योजकांनी पुढे आले पाहिजे. कायद्याचा चाप कसा बसवायचा ते आमच्या वर सोडा. महाराष्ट्रात कायद्याच राज्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

रस्त्यावरील भाजी विक्रेत्यांसाठी बॅरिकेटिंग करणे, टपऱ्यांचे अतिक्रमण हटवून अवैध धंद्यांवर कारवाई करणाचे त्यांनी आश्वासन दिले. तर रात्रीच्या वेळेस पोलीस गस्त वाढविण्याचे स्पष्ट केले. तर कंपनीच्या कॅम्पसमध्ये व बाहेरील बाजूस सीसी टीव्ही कॅमेरे बसवावेत जेणे करून अजून आपली सुरक्षा व गुन्हेगारी कमी होण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, पोलीस उपाधीक्षक संपतराव भोसले, प्रांत सुधीर पाटील, किशोर जाधव, शेरकर, आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ, संजय बंदिष्टी, राजेंद्र कटारिया, सुमित लोढा, रवींद्र बक्षी,सतीश गवळी, सागर निंबाळकर, आकाश जोशी, दीपक नागरगोजे, सचिन पाठक, प्रफुल्ल पारख आदी आमी संघटनेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.



चहाच्या ठेल्याप्रमाणे 'अवैध गावठी दारुची टपरी'

## चहाच्या ठेल्याप्रमाणे चालतो 'अवैध गावठी दारुचा धंदा'

### धंद्याचे अतिक्रमण हटवून कारवाई करा : जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन

नगर - चहाच्या ठेल्याप्रमाणे अवैध गावठी दारुचे धंदे सुरु असल्याने त्यावर कारवाई करण्याची मागणी जीवनधारा प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आली आहे. दिवसाढवळ्या रस्त्याच्या कडेला सर्रासपणे गावठी दारुचे धंदे सुरु असल्याने महिला व युवतींना दारुड्यांपासून सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

बोल्हेगावमधील गांधीनगर व श्रीराम चौकातील रस्त्यावर सुरु असलेल्या गावठी दारुचा धंदा बंद व्हावा, या उद्देशाने सदरचे अतिक्रमण हटविण्यासाठी आयुक्तांना तर अवैध धंद्यावर कारवाईसाठी जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले आहे. या प्रश्नाची दखल न घेतल्यास स्थानिक नागरिक, महिलांसह दारू बाटली आंदोलन करण्याचा इशारा प्रतिष्ठानचे अध्यक्ष अमोल लगड यांनी दिला आहे.

गांधीनगर रस्त्याच्या कडेला व श्रीराम चौकातील बेकरी शेजारी अतिक्रमण करुन गावठी दारुचा धंदा थाटण्यात आला आहे. या अवैध धंद्याच्या परिसरात तीन महिन्यापूर्वी बेवारस मृतदेह देखील आढळून आले होते. गावठी दारुच्या धंद्यांमुळे परिसरातील नागरिकांसह महिला वर्गाला दारुड्यांच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या प्रकरणी महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडे तक्रार करुनही त्यांचे अतिक्रमण हटविण्यात आलेले नाही. १४ जानेवारी रोजी महिलांनी आंदोलनाचा इशारा दिला होता, मात्र मकर संक्रांत असल्यामुळे आंदोलन स्थगित करण्यात आले. गावठी दारुच्या धंद्यामुळे सर्वांना त्रास होत असल्याने त्यांचे अतिक्रमण हटवावे व पोलीस प्रशासनाने त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी जीवनधारा प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आली आहे.

# अमृतसर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या विटंबनेचा नगरमध्ये निषेध

### समाजकंटकावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करुन मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा देण्याची मागणी; शहरातील समस्त आंबेडकरी समाजाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने





अमृतसरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या विटंबनेचा शहरातील समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने निषेध नोंदविण्यात आला.

नगर - प्रजासत्ताक दिनी पंजाब मधील अमृतसर मध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या विटंबनेचा शहरातील समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने निषेध नोंदविण्यात आला. तर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करुन सदरील समाजकंटकावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करुन मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली. वारंवार बाबासाहेबांचा पुतळा व संविधानाच्या विटंबनेवर प्रश्न उपस्थित करण्यात आला. यावेळी सकल मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने देखील या घटनेचा निषेध नोंदवून, आंबेडकरी समाजाच्या सदर मागणीला पाठिंबा दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यावर शिडीच्या सहाय्याने चढून एका समाजकंटकाने हातोड्याचे साहाय्याने सदर पुतळा फोडण्याचे कृत्य केले. सदर आरोपीला पोलिसांनी पकडले असून, त्याच्यावर कठोर कारवाई होणे अपेक्षित आहे. राज्य व केंद्र सरकार यांनी संयुक्तपणे कायदा करुन देशातील महापुरुषांचा अवमान व विटंबना करणाऱ्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची तरतुद केल्यास अशा प्रवृत्तींना लगाम लागणार आहे. देशात सातत्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे व संविधानाची विटंबना होत आहे. महापुरुषांच्या पुतळ्याची विटंबना करण्याचा हेतू हा राजकीय भाग असल्याचे आंबेडकरी समाजाला जाणवत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

काही दिवसांपूर्वी परभणीत सुद्धा बाबासाहेबांच्या पुतळ्याजवळ असलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करण्यात आली. त्या ठिकाणी सुद्धा मोठी दंगल झाली. त्यामध्ये सोमनाथ सूर्यवंशी याचा बळी गेला, अद्यापि त्याच्या कुटुंबीयांना न्याय मिळालेला नाही. वारंवार बाबासाहेबांच्या पुतळ्याची व संविधानाच्या विटंबनेच्या मागील मास्टरमाइंड शोधण्याची गरज असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

अमृतसर येथे घडलेला प्रकार अत्यंत निंदनीय आहे. बाबासाहेब एका जाती धर्माचे नसून, सर्व धर्मीयांचे व समाजाचे आहे. संविधान देशातील सर्व समाजासाठी आहे. त्यांच्या पुतळ्याची विटंबना होत असताना कोणताच राजकीय पुढारी पुढे येऊन निषेध नोंदवत नाही, तर ज्या समाजाला त्यांच्यामुळे आरक्षण मिळाले ते समाज देखील गप्प आहेत. इतर देशांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे उभारले जातात, मात्र आपल्या देशातील त्यांचे पुतळे असुरक्षित आहेत. स्वातंत्र्याच्या ७६ वर्षानंतर देखील जातीयता संपलेली नसल्याची भावना आंबेडकरी समाजाच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

राष्ट्रपतींनी सदर घटनेच्या चौकशीसाठी कमिटी नेमून अमृतसर व परभणी येथील घटनेच्या मागे कोण मास्टर माईंड आहे? याचा तपास करावा, महापुरुषांच्या पुतळ्याचे विटंबन करणाऱ्यास मरेपर्यंत जन्मठेपची शिक्षा देण्याची मागणी आंबेडकरी समाजाच्या वतीने करण्यात आली आहे.

## भगवानदास देसरडा यांचे अल्प आजाराने निधन



नगर - देवळाली प्रवरा येथील भगवानदास बंडुलाल देसरडा (वय ८०) यांचे ३० जानेवारी रोजी निधन झाले. त्यांच्यावर देवळाली प्रवरा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, ३ मुली, जावई असा परिवार आहे. ते आशिष (ललीत) यांचे वडील तर सुनील बन्सीलाल पारख यांचे मेहुणे होत.

## आप्पासाहेब पा. मोरगे यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर - येथील आप्पासाहेब मुरलीधर पा. मोरगे (वय ७१) यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, तीन मुले, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. बाबासाहेब मुरलीधर मोरगे यांचे थोरले बंधू, बाळासाहेब, सुरेश व रमेश मोरगे यांचे वडील, निखिल बाबासाहेब मोरगे यांचे चुलते होत.

## पुष्पलताबाई काळे यांचे दुःखद निधन



नेवासा - जिल्हा सहकारी बँकेच्या माजी संचालिका पुष्पलता काळे (वय ८०) यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्यावर सोनई येथे अंत्यसंस्कार करण्यात आले

पुष्पलता काळे या धार्मिक, सामाजिक, आर्थिक व सहकार चळवळीशी संबंधित होत्या. त्यांनी बाभळेश्वर दूध संघ, मुळा सहकारी साखर कारखाना व अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक या बँकेचे संचालक पद भूषवले होते. तालुक्यातील सोनई येथील शेतकरी व मूळा कारखान्याचे सेवानिवृत्त अधिकारी अमृतराव काळे यांच्या पत्नी होत. सेवानिवृत्त कृषी अधिकारी हेमंतराव काळे व सायकलपटू शरद काळे पाटील हे दोन मुले, मनीषा कोठावळे (काळे) ही मुलगी, पती, नातवंडे, सुना असा परिवार आहे.

## दुचाकीची चोरी

नगर - रस्त्याच्या कडेला हँडेल लॉक करून लावलेली होंडा कंपनीची एच एफ डिलक्स मोटारसायकल (क्र. एम एस १६ सी बी ६६१२) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याची घटना नगर पुणे रोडवरील सिद्धेश मोटर्स समोर २८ जानेवारीला सकाळी ९.३० ते सायंकाळी ६ या दरम्यान घडली. याप्रकरणी विनोद वसंत हरेश्वर (रा. हनुमाननगर, नगर दौंड रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरूद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ अन्वये चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली. पुढील तपास सहाय्यक फौजदार सोनवणे करीत आहे.

## बालिकाश्रम रोडवर दारू अड्ड्यावर छापा

नगर - विनापरवाना बेकायदेशीररित्या गावठी हातभट्टीची दारूची विक्री होत असलेल्या दारू अड्ड्यावर तोफखाना पोलिसांनी छापा टाकला. कारवाईत १ हजार ५०० रुपये किमतीची १५ लिटर गावठी हातभट्टीची दारू जप्त केली. ही कारवाई बालिकाश्रम रोडवरील चामड्याच्या कारखान्याजवळ २९ जानेवारी रोजी सायंकाळी केली. दारू विक्री करणारा सचिन शिवाजी साळवे (रा. हरिजन वस्ती, निलक्रांती चौक) याला पोलिसांनी पकडले असून त्याच्या विरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात पो.कॉ. राहुल म्हस्के यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला आहे.

# सफाई कामगारांना किमान वेतन मिळण्याच्या मागणीसाठी निदर्शने करुन 'धरणे आंदोलन'



सफाई कामगारांना किमान वेतन मिळण्याच्या मागणीसाठी अखिल महाराष्ट्र सफाईगार व चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेच्यावतीने निदर्शने करुन 'धरणे आंदोलन' करण्यात आले.

नगर - जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायतमध्ये कार्यरत कंत्राटी सफाई कामगारांना किमान वेतन कायदा १९४८ नुसार वेतन मिळत मिळावे, भविष्य निर्वाह निधी व कामगारांसाठी असलेल्या इतर सुविधा मिळण्याच्या मागणीसाठी अखिल महाराष्ट्र सफाईगार व चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय व सहाय्यक कामगार आयुक्त यांच्या दालना समोर निदर्शने करुन धरणे आंदोलन करण्यात आले.

संघटनेचे जिल्हाध्यक्ष तानसेन बिवाल यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात नगरपरिषद व नगरपंचायत मधील कंत्राटी कामगार सहभागी झाले होते. सदर आंदोलनाची दखल घेऊन सहाय्यक कामगार आयुक्त रे.मु. भिसले यांनी तातडीने आंदोलकांसह बैठक घेऊन जिल्ह्यातील नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायतची विविध कामगार कायद्यांतर्गत पुढील १५ दिवसात तपासणी करण्यात येऊन, कामगार कायद्याची अंमलबजावणी न करणाऱ्या नगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायतीवर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे लेखी आश्वासन दिले. तर सर्व नगरपरिषदेत कंत्राटी कामगारांना किमान वेतन मिळत नसल्यास किमान वेतन अधिनियम १९४८ च्या कलम २० (२) अन्वये रितसर दावा कार्यालयास सादर करण्याचे सांगण्यात आले आहे. सदर लेखी आश्वासन मिळाल्याने धरणे आंदोलन मागे घेण्यात आले.

जिल्ह्यातील राहता, देवळाली, राहुरी, शेवगाव, नेवासा, श्रीरामपूर, संगमनेर, कोपरगाव, पाथर्डी नगरपरिषद व अकोला व इतर नगरपंचायतमध्ये कार्यरत कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायदा १९४८ नुसार वेतन दिले जात नाही. तसेच भविष्य निर्वाह निधीसह इतर सुविधांचा लाभ दिला जात नसल्याचा संघटनेने आरोप केला आहे.

जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपालिका शाखांना या प्रश्नाबाबत गांभीर्य नसल्याने ते कोणत्याही तारखेला उपस्थित राहिलेले नाही. महाराष्ट्र शासन व नगरपालिका प्रशासन संचालनालय यांनी देखील वारंवार पत्राद्वारे आदेशित केले आहे. राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग (नवी दिल्ली) अध्यक्ष गोरख लोखंडे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेतली होती. त्याच अनुषंगाने किमान वेतन देण्याबाबतचे अनेक वेळा आदेशित केलेले आहे. परंतु जिल्ह्यातील नगरपालिका, नगरपंचायतीमध्ये कोणत्याही प्रकारचे किमान वेतन १९४८ नुसार अंमलबजावणी होत नाही. महाराष्ट्र शासन परिपत्रक व वरिष्ठांच्या आदेशांची पायमल्ली होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

सफाई कर्मचारी हा घटक स्वतःचे जीव धोक्यात घालून, इतरांच्या आरोग्यासाठी स्वच्छतेचे काम एकनिष्ठपणे करीत आहे. त्यांना पगार दोनशे रुपये, अडीचशे रुपयाप्रमाणे ठेकेदार हजेरी देत आहे. त्यांना अपशब्द वापरून हिणवले जाऊन कामावरून काढण्याची धमकी देखील दिली जात आहे. लाखो रुपयांचे टेंडर पास करून संबंधित अधिकारी कामगारांच्या टाळूवरचे लोणी खात आहे, असे अखिल महाराष्ट्र सफाईगार व चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष तानसेन बिवाल म्हणाले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### झोपा पण रात्री १० वाजता

रात्री १० वाजता झोपल्याने तुमचे शरीर त्याच्या नैसर्गिक झोपेच्या चक्राशी सुसंगत राहते. हे तुम्हाला गाढ झोप घेण्यास मदत करते, ज्यामुळे तुम्हाला दुसऱ्या दिवशी ताजेतवाने आणि उत्साही वाटते. रात्री १०वाजता झोपल्याने तुमच्या शरीराला आणि मनाला विश्रांती घेण्याची संधी मिळते. यामुळे तणाव संप्रेरकांची पातळी कमी होते, ज्यामुळे तुम्हाला अधिक शांत आणि आरामदायी वाटते.

## पाककला

### कॉर्न रॅब

**साहित्य :** कॉर्नचे दाणे – १ कप, दूध – २ कप, साखर – चवीनुसार, तूप – १ टीस्पून, वेलची पावडर – एक चिमूटभर

**कृती :** मक्याचे दाणे धुवून २-३ तास पाण्यात भिजत ठेवा. एका पॅनमध्ये तूप गरम करा, त्यात भिजवलेले कॉर्न घाला आणि सोनेरी तपकिरी होईपर्यंत परतून घ्या. त्यात दूध घाला आणि उकळी येऊ द्या.

अर्धे दूध शिल्लक राहिल्यावर साखर आणि वेलची पावडर घाला आणि चांगले मिसळा. गॅस बंद करा आणि गरमागरम कॉर्न रॅब सर्व्ह करा.

## वास्तू

### वरचा मजला

* शक्यतो ईशान्य दिशेत वरच्या मजल्यावर बांधकाम घेऊच नये. घेतल्यास या दिशेत ओपन टेरेस, दिवाणखाना किंवा कमीत कमी वजन व जास्तीत जास्त मोकळेपणा असणे अत्यावश्यक असते.

* तळघरास पांढरा रंग चांगला असतो.

* ईशान्य कोपऱ्यातील तळघर चांगले मानले जाते. त्यात अंडरग्राऊंड वॉटर टँकची व्यवस्था केल्यास खूपच चांगले असते.

## सल्ला

अनेक दिवसांपासून बंद असलेल्या तळघरात एकदम एकट्याने प्रवेश करू नये. कारण त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाईट शक्ती एकवटलेल्या असण्याची शक्यता असते.

## सौंदर्य

देसी तूप सतत ओठांवर लावल्यास तडक्यांची तसेच भेगा पडण्याची समस्या दूर होते. याने काळेपणा नाहीसा होऊन ओठ मऊ व गुलाबी होतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. ३१ जानेवारी २०२५

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, माघ शुक्लपक्ष, शततारा २८।१४, सूर्योदय ०६ वा. २६ मि. सूर्यास्त ०५ वा. ३४ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आज आपणास जास्त खर्च करावा लागू शकतो. आरोग्य उत्तम राहील.

**वृषभ :** एखादे नवे नाते आपल्यावर प्रभाव पाडेल. प्रवासाचे योग संभवतात. व्यवसायात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक कराल.

**मिथुन :** इतरांना सहकार्य केल्याने वाद कमी होतील. महत्त्वाची जबाबदारी मिळेल. समोरून येणारे प्रस्ताव चांगले असतील.

**कर्क :** स्वतःला इतर लोकांसमोर सादर करण्याचे सामर्थ्य अंगी येईल. संधी आलेली आहे ती सोडायची नाही, असे विचार मनात येतील.

**सिंह :** एखाद्या सामुदायिक योजनेत इतर लोकांबरोबर आपले सहकार्य तुमची उत्तम राजकीय जाण दाखवेल.

**कन्या :** आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल. जोडीदाराच्या सल्ल्याने पुढे जाल.

**तूळ :** अधिकार क्षेत्र वाढेल. शत्रूंना भीती वाटेल. राजकीय विषयांमध्ये आनंदी आनंद गडे.

**वृश्चिक :** उत्साहजनक वार्ता मिळतील. लेखन कार्यात प्रगती होईल. व्यस्त राहाल. यंत्रे व वाहने जपून चालवाल.

**धनु :** देवाण-घेवाण काळजीपूर्वक कराल. अत्यंत व्यस्त राहाल. व्यापार व्यवसायात वेळीच सावध राहिल्याने फायदा

**मकर :** आनंद वाढेल. शत्रूंपासून सावध राहा. मित्रांच्या सहयोगाने कार्यांमध्ये सहजपणा राहील.

**कुंभ :** मुलांवर खर्च होईल. कौटुंबिक प्रश्नांची उत्तरे मिळतील. वेळेचे भान पाळाल. शेजाऱ्यांविषयी आपुलकी वाटेल.

**मीन :** महत्त्वाच्या कामांमध्ये सावधगिरी बाळगाल. आपली सर्व कामे योग्य वेळी पूर्ण करण्यासाठी आज गंभीर विचार कराल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

### धसका

पाकिस्तानातील एक कर्नल आपल्या जवानांना सांगत होता,
'एखादा मृत भारतीय जवान दृष्टीस पडला तर शंभर मारले असे सांगत चला.'
एका जवानाने त्यावर प्रश्न केला, 'पण एखादा जिवंत दृष्टीस पडला तर?'
कर्नल उत्तर दिले, 'जीव मुठीत धरुन पळत सुटा'


# करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* जगातील सर्वात मोठा सफारी पार्क कोणत्या राज्यात विकसित केला जात आहे?

– हरियाणा

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## फिल्मीचक्कर क्र. ११७४ सौ. शैलजा कुलकर्णी




**आडवे शब्द :-** १) ++ + ++ +++ चलो प्रेम की गंगा बहाते चलो (गाणे) ४) सर्कशीवर आधारित राज कपूर यांचा चित्रपट ७) ++ घर के सामने (चित्रपटाचे नाव) ८) सुनील दत्त, विमी, राजकुमार, मुमताज, बलराज सहानी, मदनपुरी यांचा एक गाजलेला चित्रपट ११) ++ पाटेकर (अभिनेता) १२) +++ कल्याणपूर (प्रसिद्ध गायिका) १३) ++ दिया जाय या छोड दिया जाय बोल तेरे साथ क्या सुलूक किया जाय (गाणे) १४) जितेंद्र, लीना चंदावरकर, मेहमूद यांचा एक चित्रपट १५) मनोजकुमार, आशा पारेख यांचा एक चित्रपट (याच नावाचा माधुरी दीक्षितचाही चित्रपट आहे)

**उभे शब्द :-** १) ++ बने ज्वाला (चित्रपटाचे नाव) २) 'पंख होते ते ऊड आती रे' या गाण्याचा चित्रपट ३) गायन करणारा ४) ++ ++++ मेरे दोस्त (चित्रपटाचे नाव) ५) जुन्या काळातील एक प्रसिद्ध दिवंगत गायिका तथा अभिनेत्री ६) +++ टंडन (अभिनेत्री) ९) ++ का मीत (चित्रपटाचे नाव) १०) अमिताभ बच्चन, सायराबानो, शम्मी कपूर, इंद्रायणी मुखर्जी यांचा एक चित्रपट ११) अजय देवगण, जुही चावला, नसिरुद्दीन शहा यांचा एक चित्रपट १३) एक फूल दो ++ (चित्रपटाचे नाव)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** कधीच म्हणू नये दिवस आपले खराब आहेत, ठणकून सांगावे, काट्यांनी वेढलेला मी पण गुलाब आहे.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## फळ विक्रेते वर्तमानपत्रात फळे का गुंडाळतात?

तुम्ही पाहिले असेल की बाजारात फळ विक्रेते अनेकदा वर्तमानपत्रात फळे गुंडाळतात. तुम्ही हे का करता? ही फक्त एक परंपरा आहे की त्यामागे काही वैज्ञानिक कारण आहे? जाणून घ्या वर्तमानपत्रात फळांच्या पृष्ठभागावरील अतिरिक्त ओलावा शोषून घेते, त्यामुळे फळे लवकर खराब होण्यापासून रोखते. जास्त ओलावा फळ कुजण्यास आणि बुरशी येण्यास कारणीभूत ठरू शकतो. वर्तमानपत्र फळांचे बाह्य नुकसानापासून संरक्षण करते. उदाहरणार्थ, जर फळ पडले तर वर्तमानपत्राचे आवरण तुटण्यापासून वाचवते. वर्तमानपत्र फळांना बाहेरील तापमानात अचानक होणाऱ्या बदलांपासून वाचवते. वर्तमानपत्र नैसर्गिक इन्सुलेटर म्हणून काम करते, ज्यामुळे फळे हळूहळू थंड होतात किंवा गरम होतात. वर्तमानपत्रात गुंडाळलेली फळे चांगली दिसतात आणि ग्राहकांना आकर्षित करतात तसेच काही लोकांसाठी, फळे वर्तमानपत्रात गुंडाळणे ही एक जुनी परंपरा आहे जी पिढ्यानपिढ्या चालत आली आहे. पण, काही तोटे देखील आहेत. जसे वर्तमानपत्रांमध्ये वापरलेली शाई फळांच्या संपर्कात येऊ शकते, ज्यामुळे फळे दूषित होऊ शकतात. वर्तमानपत्रांमध्ये वापरल्या जाणाऱ्या रसायनांचा फळांच्या चव आणि गुणवत्तेवर परिणाम होऊ शकतो. फळे गुंडाळण्यासाठी वर्तमानपत्र वापरणे पर्यावरणासाठी हानिकारक आहे. आजकाल, फळे गुंडाळण्यासाठी अनेक चांगले पर्याय उपलब्ध आहेत. फळे वर्तमानपत्रात गुंडाळण्याची परंपरा जुनी आहे, परंतु त्याचे काही तोटे देखील आहेत. आजकाल, फळांच्या आवरणासाठी अनेक चांगले पर्याय उपलब्ध आहेत जसे कागदी पिशव्या आणि बांबूच्या टोपल्यांसारखे जे पर्यावरणपूरक आणि आरोग्यासाठी सुरक्षित आहेत.

## जटाधारी संन्यासी

विजयनगरचे राजा कृष्णदेवरायाच्या मनात एक मोठे शिवमंदिर बांधण्याची इच्छा निर्माण झाली. हा विचार मनात ठेवून त्यांनी आपल्या खास मंत्र्यांना बोलावले आणि शिवमंदिरासाठी चांगली जागा शोधण्यास सांगितले. आता काही दिवसांतच सर्वांनी शिवमंदिरासाठी चांगली जागा निवडली. राजालाही ते ठिकाण आवडले आणि त्यांनी तिथे काम सुरू करण्याची परवानगी दिली. तसेच राजाने मंदिर बांधण्याची संपूर्ण जबाबदारी एका मंत्र्याकडे सोपवली. त्याने काही लोकांना सोबत घेतले आणि ती जागा स्वच्छ करायला सुरुवात केली. त्यानंतर तिथे उत्खननादरम्यान शंकर देवाची सोन्याची मूर्ती सापडली. सोन्याची मूर्ती पाहून मंत्रीच्या मनात लोभ निर्माण झाला. त्याने लोकांना ती मूर्ती आपल्या घरात ठेवण्यास सांगितले. तसेच काही सफाई कामगार तेनालीरामच्या विश्वासातील होते. त्यांनी तेनालीला सोन्याच्या मूर्तीबाबत आणि मंत्र्यांच्या लोभाबद्दल सांगितले.

आता काही दिवसांनी, मंदिरासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी भूमिपूजनाचा शुभ मुहूर्त निश्चित करण्यात आला. दुसऱ्या दिवशी राजाने आपल्या सर्व मंत्र्यांना मूर्तीबद्दल चर्चा करण्यासाठी दरबारात बोलावले. तेवढ्यात एक जटाधारी संन्यासी दरबारात आला. संन्यासीला पाहून सर्वांनी त्याला आदराने बसण्यास सांगितले. एका आसनावर बसून संन्यासीने राजाला सांगितले की महादेवाने स्वतः त्याला येथे पाठवले आहे. मला माहित आहे की तुम्ही लोक शिवमंदिर बांधण्याचा विचार करत आहात आणि तिथे कोणत्या प्रकारची मूर्ती स्थापित करावी याबद्दल येथे चर्चा सुरू आहे. म्हणूनच मी इथे आलो आहे.

आता जटाधारी संन्यासी पुढे म्हणाले की, तुम्हा लोकांच्या समस्या दूर करण्यासाठी भगवान शिवाने मला येथे पाठवले आहे. राजा कृष्णदेव आश्चर्याने म्हणाले की, भगवान शिवानेच तुम्हाला पाठवले आहे. संन्यासी म्हणाले, शिव शंभूंनी तुमच्यासाठी त्यांची सोन्याची मूर्ती पाठवली आहे. जटाधारी संन्यासीने एका मंत्र्याकडे बोट दाखवले आणि म्हणाले की देवाने ती मूर्ती या मंत्र्याच्या घरात ठेवली आहे. असे बोलून संन्यासी तिथून निघून गेला. संन्यासीचे शब्द ऐकल्यानंतर मंत्री भीतीने कापत होता. आता त्याला राजासमोर कबूल करावे लागले की त्याला उत्खननादरम्यान सोन्याची मूर्ती सापडली होती. हे सर्व पाहून, राजाने दरबारात नजर फिरवली आणि तेनालीरामचा शोध घेतला, पण तो कुठेच दिसला नाही. मग काही वेळाने तेनालीराम दरबारात आला. त्याला पाहताच सर्वजण जोरजोरात हसायला लागले. मग एक व्यक्ती म्हणाला की, तूच जटाधारी संन्यासी होता, कारण तू गळ्यातील माळ काढायला विसरलास. आता राजाने तेनालीरामची स्तुती करत मंदिराचे काम पूर्ण करण्याची जबाबदारी तेनालीरामकडे दिली.

तात्पर्य : कधीही लोभ करू नये. अति लोभाचे फळ केव्हाही वाईटच मिळते.

# रहमते दर्शन (भाग – १)



मुझे संत दर्शनसिंह जी महाराज के चरणों में बैठने का सौभाग्य काफ़ी समय तक प्राप्त हुआ। उनके चरणों में बैठने से मुझे पता लगा कि महाराज जी आध्यात्मिक जीवन के लिए पाँच मूलभूत सिद्धांतों को अपनाने पर बल दिया करते थे। ये सिद्धांत हैं- अहिंसा, सच्चाई, पवित्रता, विनम्रता और निष्काम सेवा । वास्तव में आध्यात्मिक पथ का आधार ही परमात्मा की बनाई हुई सृष्टि के हर जीव से प्रेम करना है। उन्होंने आध्यात्मिकता को विज्ञान की तरह पेश किया। उन्होंने हमेशा इस बात पर बल दिया कि इस अमूल्य मानव जीवन का सबसे पहला ध्येय, स्वयं को जानना और प्रभु को पाना है, ताकि इस जीवन में आत्मा का मिलन परमात्मा से हो सके। इस ध्येय की प्राप्ति के लिए सदाचारी जीवन का होना बड़ा आवश्यक है। सदाचारी जीवन तथा सुरत-शब्द योग द्वारा ही हम परमात्मा की

### मधुर यादें

ज्योति और उसके संगीत से संपर्क स्थापित कर सकते हैं। वे प्रभु रूप थे। वे आईना (दर्पण) थे, जिसमें हमें परम पिता परमात्मा के दर्शन होते थे। वे लोग कितने भाग्यशाली होते हैं जो एक संपूर्ण गुरु के साये में स्थान प्राप्त कर लेते हैं। सर्वप्रथम गुरु ही हमसे प्यार करता है और उसके प्रेम की तरंगें हमसे प्रतिबिंबित होती हैं। और इस प्रकार हमारा प्रेम बढ़ता है। अपनी अनकही और अलिखित दिव्य भाषा के द्वारा उन्होंने गुरु की तरफ हमारे लिए जीवन और मृत्यु की गुत्थी को सुलझाया।

एक दिन जब मैं उनके चरणों में बैठा था तो किसी ने प्रश्न किया कि अपराधी भी परमात्मा में विश्वास करते हैं और सज्जन पुरुष भी उसका ध्यान करते हैं तो उन दोनों में क्या अन्तर है? महाराज जी ने बताया, अपराधी वास्तव में परमात्मा पर विश्वास नहीं करते, क्योंकि उस पर विश्वास करने का अर्थ है, अपने आपको उसके समक्ष समर्पण कर देना। चोर परमात्मा से प्रार्थना करता है कि मेरी सहायता करो, यदि मै इस डकैती में सफल हो गया तो मुझे जितना माल मिलेगा उसमें से आधा मैं आपको दान दे दूँगा। इस प्रकार अपराधी लोग परमात्मा को भी सहायता के बदले घूस देने का प्रयत्न करते हैं। दूसरी ओर संत जन जब प्रभु से प्रार्थना करते हैं तो वे स्वयं को उस पर समर्पित कर देते हैं। वे इस प्रकार प्रार्थना करते हैं, मैं तुम्हारे दर पर बैठा हूँ, मैं निर्बल हूँ, मेरे लिए जो आप अच्छा समझें, वही करें। तेरा भाणा मीठा लागे। सज्जनों और दुर्जनों की प्रार्थना में यही अन्तर है। संसार में कोई भी ऐसा प्राणी नहीं है जो प्रभु पथ पर न चल सके । प्रत्येक मनुष्य सुधर सकता है। महान भारतीय ग्रंथ रामायण की रचना संत बाल्मीकि ने की थी जो अपने समय का अत्यंत भयावह डाकू था।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग – २)

हमारी उन्नति हमारे आस पास के ५ लोगों से प्रभावित होती है। जो आप का लक्ष्य है उस से संबन्धित ५ विशेषज्ञों की लिस्ट बनाए, उन से मिलते रहें, अगर मिल नहीं सकते तो उन्हें कल्पना में देखते रहें और उन द्वारा लिखी पुस्तकें पढ़ते रहें।

जब आप आगे बढ़ेगें तो विरोधियों से आप को तरह तरह के दर्द मिलेगें। ऐसे बुरे दर्दों का सही प्रबन्धन हमें विकास की ओर ले जाएगा, अन्यथा बर्बाद भी हो सकते हैं। आप बुरे अनुभवों पर किस तरह प्रतिक्रिया करते हैं। क्या आप गुस्से से फट पड़ते हैं। आप अपने को भावनात्मक रूप से सिकोड़ लेते हैं। क्या दर्द को नजरंदाज कर देते हैं। दर्द हमें अपने रास्ते पर मुर्दे की तरह रोक सकता है। क्या दुःख की बाढ़ से निर्णय बदल देते हैं या टाल देते हैं। बहुत कम लोग दुःख से सीख लेते हैं परंतु ज्यादातर लोग दूसरों से मिले दुखो को पकड़ कर रखते हैं और जिंदगी भर दुखी रहते हैं। इस संसार

### दिमाग की शक्ती

में त्रासदी के बाद भी हमें काम करना होता है। हमें भूमिकाएं निभानी होती हैं। जीवन ठहर तो सकता है परंतु रुकता नहीं, सच्चाई यही है। कोई भी बुरे अनुभवों से बच नहीं सकता। आप कहीं भी रहते हो, चाहे आप कुछ भी करते हो या चाहे आप की पृष्ठ भूमि केसी भी हो, आप को बुरे अनुभवों से निबटना होगा। आप अच्छे इन्सान हैं सिर्फ इस लिये यह उम्मीद न करें कि संसार आप के साथ न्यायपूर्ण रहेगा। बैल से खुद पर हमला न करने की उम्मीद नहीं करनी चाहिए क्योंकि आप शाकाहारी हैं। हमें दर्द तब होता है जब हम नियमो का उल्लंघन करेगें। समाज विरोधी बनेगें तो समाज दुःख देगा। इसलिए समाजिक मर्यादाओं में चलो। परिवार विरोधी कार्य करेगें तो परिवार दुःख देगा। इस लिये परिवार के नियमों पर चलो। जब हम भोजन के नियमों को नहीं मानते हैं तो अनेकों रोग खड़े हो जाते हैं।

अब देखो आप को किस चीज का दुःख है। किस से दुःख है, रोग से, व्यक्ति से, परिवार से, समाज से, सरकार से, या मन में दुःख है। जिस से भी दुःख है तो समझ लो हम उस से संबन्धित नियमो का पालन नहीं कर रहे हैं। नियम पुस्तकों में लिखे हुए हैं। अपने दुःख से संबन्धित पुस्तकें पढ़ना शुरू कर दो आप के सभी दुःख खत्म हो जाएगें। राजयोग के अभ्यास से आधी व्याधि सब प्रकार के दुःख खत्म हो जाते हैं। कुछ दर्द हम सभी झेलते हैं। अनुभवहीनता का दर्द। अक्षमतता का दर्द। निराशा का दर्द। संघर्ष का दर्द। परिवर्तन का दर्द। खराब स्वास्थ्य का दर्द । कठोर निर्णयों का दर्द। वितीय हानि का दर्द। संबंधो का दर्द। नंबर वन न बनने का दर्द। यात्रा का दर्द। जिम्मेवारी का दर्द। इसी प्रकार के अनेको अन्य दर्द हैं जो हरेक व्यक्ति को कभी न कभी झेलने पड़ते हैं।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

११) आहारामध्ये घरचे बनविलेले लोणी, गोड ताक, तूप यांचा वापर करावा.

१२) भरपूर विश्रांती घ्यावी. मनाला क्लेशदायक विचारांपासून दूर ठेवावे व रोज रात्री नियमितपणे लवकर झोपावे.

१३) काही कारणास्तव दूध कमी पडल्यास गायीचे अथवा शेळीचे दूध बालकाला द्यावे. ते देताना एक भाग दूध व १ भाग पाणी त्यामध्ये १ चमचा साखर व वावडिंगाचे १०-१२ दाणे टाकून उकळावे. उकळल्यानंतर गाळून कोमट असताना बाळाला पाजावे. बाळाला बाटलीतून दूध कधीही पाजू नये. वाटी व चमच्याने दूध पाजावे. वाटी व चम चा स्वच्छ धुवून उकळावा व नंतर त्याने दूध पाजावे. म्हशीचे दूध हे पचायला जड असल्याकारणाने ते दूध बाळाला पाजू नये.

### नवजात बालकाची परिचर्या

**स्तन्यदुष्टी :**

शिळे अन्न खाल्ल्याने, अति जागरण केल्याने, अजीर्ण होईल एवढा आहार केल्याने, दुपारी झोपल्याने तसेच आंबट पदार्थ खाल्ल्याने राग, क्रोध, चिंता, अति मानसिक ताण, अभिष्यंदी पदार्थांचे सेवन या कारणांनी स्तन्याचे रूप, रस, गंध तसेच भौतिक व रासायनिक गुण बदलतात.

**स्तन्यदुष्टी होऊ नये याकरिता घ्यावयाची काळजी :**

१) स्तन्यदुष्टी होऊ नये म्हणून मातेने आपली शारीरिक व मानसिक अवस्था सुरुवातीपासूनच चांगली ठेवावी.

२) साधा पौष्टिक व अजीर्ण होणार नाही इतपत आहार घ्यावा.

३) आहारामध्ये भरपूर प्रमाणात घरी बनविलेल्या हळदीचा उपयोग करावा. याने स्तन्य शुद्ध राहण्यास मदत होते.

४) आहारामध्ये फोडणीला जिरे, हिंग, मोहरी यांचा वापर करावा. यामुळे देखील स्तन्य शुद्ध राहण्यास मदत होते.

५) जेवणानंतर बडीशेप, ओवा, धनाडाळ, तीळ यांपासून बनविलेले मिश्रण बारीक चावून खावे.

६) आठवड्यातून दोन ते तीन वेळा हुलग्याचे सूप जिऱ्याची फोडणी देऊन प्यावे. तसेच मूग, मसूर यांचेही सुंठ, मिरी, पिंपळी व सैंधव घालून सूप तयार करावे व प्यावे.

७) स्तनांवर हलक्या हाताने मसाज करावा. अशा रितीने स्तन्यदुष्टी होऊ नये म्हणून काळजी घ्यावी.

८) स्तन्यशुद्धीसाठी काडे चिराईत काढा, सुंठ, गुळवेल यांचा काढा करुन घ्यावा.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# देशभक्तीचे संस्कार आदर्श राष्ट्र निर्मितीस प्रेरक

## अनिल बाविस्कर यांचे प्रतिपादन; अहिल्यानगर जिल्हा वाचनालय प्रजासत्ताक दिनी स्फूर्ती स्पर्धेत आयकॉन पब्लिक स्कूल व ज्ञानसंपदा प्रथम

नगर – बालवयात देशप्रेम, राष्ट्रभक्तीचे स्फुल्लिंग पेटवण्यासाठी आणि वाचनाची अखंड परंपरा चालवणारी अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाची ही चळवळ उद्याच्या आदर्श राष्ट्र निर्मितीस प्रेरक आहे. या स्पर्धेचा डंका संपूर्ण राज्यभर जावा व यातून उगवत्या पिढीला प्रेरणा मिळावी असा आशावाद सहाय्यक ग्रंथालय संचालक छत्रपती संभाजीनगर अधीक्षक अनिल बाविस्कर यांनी व्यक्त करून विजेत्या संघांचे अभिनंदन केले.




जिल्हा वाचनालय प्रजासत्ताक दिनी स्फूर्ती स्पर्धेत ज्ञानसंपदा इंग्लिश मीडियम स्कूल, आयकॉन पब्लिक स्कूलने प्रथम क्रमांकाचा मानाचा चषक पटकावला स्पर्धेचे पारितोषिक वितरण सहाय्य ग्रंथालय संचालक छत्रपती संभाजीनगर अधीक्षक अनिल बाविस्कर यांच्या देण्यात आले. (छाया – सुरेश मैड)

देशप्रेम राष्ट्रभक्तीचा स्फूर्तीने जयघोष करत बालकांनी बलशाली भारताचे स्फूर्ती गीते गायली व उपस्थित त्यांच्या मनात देशभ्रमाचे पुल्लिंग पेटले. अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या प्रजासत्ताक दिन स्फूर्ती स्पर्धेत नगर जिल्ह्यातील सुमारे ३३ संघाने सहभाग घेतला. यात गट क्रमांक एक मध्ये ज्ञानसंपदा इंग्लिश मीडियम स्कूल तर गट क्रमांक दोन मध्ये आयकॉन पब्लिक स्कूलने प्रथम क्रमांकाचा मानाचा चषक पटकावला. स्पर्धेचे पारितोषिक वितरण अनिल बाविस्कर यांच्या हस्ते झाले.

यावेळी ग्रंथालय निरीक्षक रामदास शिंदे, हिंद सेवा मंडळाचे संचालक अजित बोरा, वाचनालयाचे अध्यक्ष प्राध्यापक शिरीष मोडक, प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड, स्पर्धेचे समन्वयक किरण अग्रवाल, उपाध्यक्ष दिलीप पांढरे, प्राध्यापक ज्योती कुलकर्णी, शिल्पा रसाळ, परीक्षक डॉ.धनश्री खरवंडीकर, अनुजा कुलकर्णी, ग्रंथपाल अमोल इथापे, सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारताल, पल्लवी कुक्कडवाल उपस्थित होते.

प्रा. मोडक यांनी प्रास्ताविकात देश प्रेमाचा जोश घेऊन येणार्या या स्पर्धेचा वाढता प्रतिसाद हा या स्पर्धेचे यश असून याची व्यापकता सतत वृद्धिंगत होत जाईल असे प्रतिपादन केले.

विक्रम राठोड यांनी बोलताना देश प्रेम, कला, संस्कृती व बालकांच्या अंगी असणार्या गुणांना पालक व शिक्षक यांनी दिलेले प्रोत्साहन हे आजच्या काळातील प्रेरक गोष्ट आहे. देशप्रेम वाढवण्याचा प्रयत्न खर्या अर्थाने सार्थक झाले असल्याचे प्रतिपादन केले.

स्पर्धेचा सविस्तर निकाल पुढीलप्रमाणे गट क्रमांक एक प्रथम क्रमांक ज्ञानसंपदा इंग्लिश मीडियम स्कूल, द्वितीय क्रमांक श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशन सेठ नंदलाल धूत स्कूल, तृतीय क्रमांक श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला (प्राथमिक) सावेडी, उत्तेजनार्थ नवीन मराठी शाळा भिंगार, श्री समर्थ विद्यामंदिर सांगळे गल्ली, अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूल, किशोर संस्कृत संवर्धिनी, नवीन मराठी शाळा, (प्रॅक्टिसिंग स्कूल)

गट क्रमांक दोन प्रथम क्रमांक आयकॉन पब्लिक स्कूल मल्हार चौक, द्वितीय क्रमांक श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला सावेडी, तृतीय क्रमांक– श्री रामकृष्ण एज्युकेशन फाऊंडेशन सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल, उत्तेजनार्थ ज्ञानसंपदा इंग्लिश मीडियम स्कूल, भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल, अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूल, सिताराम सारडा विद्यालय, हार्मोनियम इंटरनॅशनल स्कूल.

वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम अंतर्गत पुस्तक परीक्षण स्पर्धा विजेते कु. भारती कुशवाह, खुशी येनगुल, तेजश्री कोंडा, गौरवी मोढवे, सोहम कराळे, अमृता बोरुडे, या स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा.ज्योती कुलकर्णी, स्वागत प्राध्यापक शिरीष मोडक, किरण अग्रवाल तर आभार शिल्पा रसाळ यांनी मांडले.

स्पर्धेत नगर जिल्ह्यातील विविध ३३ शाळातील विद्यार्थी पालक शिक्षक सहभागी झाले होते. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी संकेत फाटक, वर्षा जोशी, नितीन ढाकणे, संजय गाडेकर यांचे सहकार्य लाभले.




मांजरसुंबा गड येथे छत्रपती अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियान राबविले.

# छत्रपती अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी केले मांजरसुंबा गड येथे 'स्वच्छता अभियान'

नगर – अहिल्यानगर मधील ऐतिहासिक स्थळ मांजरसुंबा गड स्थळाला दरवर्षी विविध कारणांसाठी पर्यटक आणि इतिहासप्रेमी भेट देत असतात आणि याच अनुषंगाने या स्थळाची स्वच्छता होणे हे देखील आवश्यक आहे आणि हीच आवश्यकता ओळखून नेप्ती येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून २६ जानेवारी रोजी अहिल्यानगर मधील मांजरसुंबा गड येथे स्वच्छता अभियान राबविले. 'स्वच्छता हीच सेवा' हे ब्रीद मनामध्ये ठेवून राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी आणि विद्यार्थिनी अभियानामध्ये सहभागी झाले. मांजरसुंबा गडाचा इतिहास जाणून घेत गडावर पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांना देखील स्वच्छता अभियानाची माहिती देत विद्यार्थ्यांनी कचरा गोळा केला व कचऱ्याची विल्हेवाट देखील लावली.

व्यक्तिगत, सामाजिक आणि वैचारिक स्तरावर स्वच्छतेविषयी समाजामध्ये जागृती होणे अति आवश्यक असल्याचे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

या स्वच्छता मोहिमेसाठी विद्यार्थी स्वयंसेवक तुषार आरवडे, शुभम भोयाटे, वैभव काळे, तसेच विद्यार्थिनी स्वयंसेविका विद्या गागरे, अनुष्का दळे यांच्या समवेत राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला. स्वच्छता मोहीम यशस्वी होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. अक्षय देखणे, प्रा. अक्षय कांबळे, विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी प्रा. अमेय कुलकर्णी, प्रा. तेजश्री धंगेकर आदींनी मेहनत घेतली.



नोटरी पब्लिकपदी ॲड. स्वाती पाटील (वाघ) यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

# नोटरी पब्लिकपदी ॲड. स्वाती पाटील (वाघ) यांची निवड

नगर – भारत सरकार तर्फे केंद्र सरकारच्या विधी व न्याय खात्याने नोटरी पब्लिकपदी ॲड. स्वाती पाटील (वाघ) यांची निवड केली आहे. २२ जानेवारी रोजी नियुक्तिचे पत्र प्राप्त झाले.

ॲड. स्वाती पाटील (वाघ) यांचे शिक्षण शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर (शिवाजी विद्यापीठ) येथे झाले. त्या अहिल्यानगर महानगरपालिकेच्या विधिज्ञ पॅनेलवर काम करीत आहे. तसेच विविध संस्थांवर विधिज्ञ म्हणून काम करीत आहेत. 'महिला वकील कक्ष' अहमदनगर जिल्हा व सत्र न्यायालय अहमदनगर येथे सत्कार करण्यात आला.

यावेळी ॲड. पल्लवी होनराव, ॲड. करुणा शिंदे, ॲड. ज्योती हिमणे (महिला कार्यकारिणी), ॲड. अनिता दिघे, ॲड. रत्ना दळवी, ॲड. वृषाली तांदळे, ॲड. सोनाली काकडे, ॲड. मुबीना जहागिरदार, ॲड. आशा गोंधळे, ॲड. दिक्षा बनसोडे, ॲड. अनुराधा येवले, ॲड. अरुणा राशीनकर आदी उपस्थित होत्या.

# SEIL Tour अंतर्गत पूर्वोत्तर भारतातील विद्यार्थ्यांचे नगर येथे स्वागत

नगर – अखिल भारतीय विद्यार्थी परिषद अंतर्गत Students' Experience in Inter-State Living (SEIL) Tour च्या निमित्ताने पूर्वोत्तर भारतातील २६ विद्यार्थी २९ जानेवारी रोजी पहाटे अहिल्यानगर येथे दाखल झाले. ही यात्रा केवळ सांस्कृतिक देवाण घेवाणी पुरती मर्यादित नसून, भारताच्या विविधतेतील एकता अधोरेखित करणारा आणि युवकांमध्ये देशप्रेमाची भावना जागृत करणारा उपक्रम आहे.




अभाविपच्या SEIL Tour अंतर्गत पूर्वोत्तर भारतातील विद्यार्थ्यांचे नगर येथे स्वागत करण्यात आले.

या विद्यार्थ्यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. ते आसाम, मणिपूर, सिक्कीम, मेघालय, नागालँड, त्रिपुरा, मिझोरम आणि अरुणाचल प्रदेश या विविध राज्यांमधून आले असून, त्यांना स्थानिक यजमान कुटुंबांमध्ये राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

या यात्रेचा उद्देश पूर्वोत्तर आणि पश्चिम भारतातील संस्कृती, परंपरा, जीवनशैली आणि शिक्षण यातील अनुभवांची देवाणघेवाण करणे हा आहे. यामुळे विद्यार्थ्यांना देशाच्या विविध भागांतील समाजजीवन जवळून अनुभवता येईल, तसेच एकात्मतेची भावना वृद्धिंगत होईल.

सकाळी हे विद्यार्थी राहुरी विद्यापीठ भेटीला रवाना होतील, जिथे त्यांना कृषी संशोधन आणि ग्रामीण विकासाबद्दल माहिती दिली जाईल. त्यानंतर, लोणी येथे दुपारच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली असून, या भोजनास प्रवरा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आणि पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील देखील उपस्थित राहणार आहेत.

यानंतर, विद्यार्थ्यांना प्रवरा साखर कारखाना दाखवण्यात येईल, जिथे त्यांना साखर उत्पादन प्रक्रियेबाबत माहिती मिळेल. संध्याकाळी, बंधन लॉन्स येथे ५० यजमान कुटुंबांसोबत मातृभोजन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, ज्यामध्ये विद्यार्थी आणि स्थानिक कुटुंबे एकत्र भोजन करतील आणि परस्परसंवाद साधतील.

३१ जानेवारी रोजी विद्यार्थ्यांसाठी विविध महाविद्यालयांत विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. त्यानंतर, सायंकाळी ६ वाजता सहकार सभागृह येथे सत्काराचा व सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात पूर्वोत्तर भारताच्या पारंपरिक नृत्य–गान सादरीकरणासोबतच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचे देखील दर्शन घडवले जाईल. या कार्यक्रमात स्थानिक नागरिक, विद्यार्थी, समाजसेवक आणि अभाविप कार्यकर्ते उपस्थित राहतील.

# करियरच्या मागे धावणाऱ्या युवा पिढीला भारतीय संस्कृतीचा विसर

## मीनाक्षी सहरावत यांचे प्रतिपादन; केडगावच्या सरस्वती विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

नगर – करियरच्या मागे धावणारी युवा पिढीला भारतीय संस्कृतीचा विसर पडत चालला आहे. त्यामुळे परकीय शक्ती आपल्या संस्कृतीवर सतत आघात करत आहेत. परदेशी नागरिक आपली संस्कृती स्विकारत आहे. परदेशींनी स्वीकारल्यावर युवक त्याकडे आकर्षित होतात. याचे ज्वलंत उदाहरण सध्या सुरु असलेल्या कुंभमेळ्यात दिसत असल्याचे प्रतिपादन सनातन महासंघ व वैदिक मिशनरीच्या संस्थापिका मीनाक्षी सहरावत यांनी केले.



केडगावच्या सरस्वती विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा झाला.

केडगाव येथील सरस्वती प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात आयोजित प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात सहरावत बोलत होत्या. प्रारंभी त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. दादाराम ढवाण यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी भारत भारती कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष कमलेश भंडारी, हेडगेवार शिक्षण प्रतिष्ठान संस्थेचे सहकार्यवाह डॉ. रवींद्र चोभे, राजेश दिघे, आयुष कटारिया, काळे सर, डॉ. बलराज पाटील, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य संभाजीराजे पवार, बीएड कॉलेज प्राचार्य डॉ. अमरनाथ कुमावत, मुख्याध्यापक संदीप भोर, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मोहिनी धर्माधिकारी आदींसह शालेय शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

पुढे सहरावत म्हणाल्या की, प्रजासत्ताक दिन साजरा करताना आपल्या हक्का विषयी ज्ञान असणे आवश्यक आहे. प्रत्येकाला वाटते की, छत्रपती शिवाजी महाराजांनी पुन्हा जन्म घ्यावा, पण त्यासाठी जिजामाता होण्यास कोणीही तयार नाही. ही मोठी शोकांतिका आहे. आजच्या काळातील मातांनी राजमाता जिजाऊ यांना आपले प्रेरणास्थान मानण्याचे त्यांनी आवाहन केले.

दादाराम ढवाण यांनी विद्यार्थ्यांना आदर्श नागरिक घडून भारत देशाची सेवा करण्याचे सांगितले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी देशाच्या विकासात्मक वाटचालीवर विद्यार्थ्यांची भाषणे झाली. विद्यार्थ्यांच्या अपूर्व उत्साहाने शाळेत प्रजासत्ताक दिन सोहळ्याला वेगळीच रंगत आली होती. भारत मातेचा जयघोष, देशभक्तीपर गीतांनी वातावरण प्रफुल्लीत झाले होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी संचलन करुन राष्ट्र ध्वजाला मानवंदना दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता खिलारी यांनी केले. आभार अनिता क्षीरसागर यांनी मानले.



मुनव्वर हुसैन सर यांचा सत्कार करताना खान अजहर सर, रियाज सर, पटेल मतीन सर, मौलवी वसीम सर, शेख मुसैब सर, अकबर सर आदी.

# अहमदनगर उर्दू हायस्कूल व मिसगर जुनियर कॉलेजच्या मुख्याध्यापकपदी मुनव्वर हुसैन सर यांची नियुक्ती

नगर – मौलाना आझाद रोड, तेलीखुंट येथील नागोरी मुस्लिम मिसगर जमाअत ट्रस्ट संचालित अहमदनगर उर्दू हायस्कूल व मिसगर जुनियर कॉलेजच्या मुख्याध्यापक पदी खान मुनव्वर हुसैन सर यांची नियुक्ती झाली.

अहमदनगर उर्दू हायस्कूल व मिसगर जुनियर कॉलेज च्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्यावतीने त्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षपदी सहा. प्राध्यापक खान अजहर सर होते. कार्यक्रमची प्रस्तावना वसीम मौलवी सर यांनी तर प्रमुख पाहुण्यांच्या परिचय सहा. प्राध्यापक रियाज सर यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख मुसैब सर यांनी केले. यावेळी शेख जफर सर, मुजाहेद सर, खान नौशीन बाजी, खान फिरदौस बाजी, खान अर्शी बाजी, खान जमजम बाजी, फजल भाई, युनुस भाई, नजम भाई उपस्थित होते.

# झावरे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचा ३१ जानेवारीला १६ वा वर्धापनदिन



डॉ. सागर झावरे



डॉ. सौ. रुपाली झावरे

नगर – येथील जुना बाजारातील झावरे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल ३१ जानेवारी २०२५ रोजी १६ वा वर्धापनदिन साजरा करत असून आतापर्यंत ३४०० च्यावर यशस्वी शस्त्रक्रिया करुन हॉस्पिटलने निरंतर आरोग्य सेवेचा वसा कायम जपला असल्याचे डॉ. सागर झावरे व डॉ. सौ. रुपाली झावरे यांनी सांगितले आहे.

हॉस्पिटलमध्ये विविध उपचार व शस्त्रक्रियेसाठी अद्ययावत आरोग्य सुविधा उपलब्ध आहेत. त्यात अहोरात्र इमर्जन्सी सेवा, जनरल सर्जरी विभाग, स्त्री रोग व प्रसूतीशास्त्र विभाग, वंध्यत्व निवारण केंद्र, स्त्रियांचे आजार व तपासणी, सुसज्ज ऑपरेशन थिएटर, सुसज्ज स्पेशल रुम्स्, स्वच्छ व प्रशस्त जनरल वॉर्ड, बर्न उपचार केंद्र, ट्रॉमा केअर सेंटर, सरकारमान्य कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया व गर्भपात केंद्र, वेदनाविरहीत प्रसूती, गॅस्ट्रोस्कोपी अन्ननलिका व जठराची दुर्बिणीद्वारे तपासणी, कोलोनोस्कोपी–मोठ्या आतड्याची दुर्बिणीद्वारे तपासणी, सर्व प्रकारच्या ओपन व बिनटाक्याच्या शस्त्रक्रिया, सेवाभावी व विनम्र स्टाफ, कॅशलेस सुविधा यांचा समावेश आहे.

# प्रेषित पैगंबरांची सप्टेंबरमध्ये दीड हजारावी जयंती होणार साजरी

### देशभरात धार्मिक उपक्रमांचे नियोजन

नगर – मुस्लिम धर्माचे प्रेषित मोहंमद पैगंबर यांची दीड हजारावी जयंती ५ सप्टेंबर २०२५ रोजी साजरी होणार आहे. यानिमित्त ऑल इंडिया रझा अकादमीने विविध धार्मिक उपक्रमांचे आयोजन देशभरात केले आहे. जानेवारीपासून हे उपक्रम सुरू असून, यात प्रत्येक दर्ग्याच्या ठिकाणी दर सोमवारी भंडारा सुरू आहे व या वर्षात जन्मणाऱ्या मुलांची नावे मोहंमद ठेवणे चालू केलेले आहे.



प्रेषित मोहंमद पैगंबर यांची १ हजार ५०० वी जयंती साजरी करण्याच्या नियोजनासाठी आलेले ऑल इंडिया रझा अकादमीचे पदाधिकारी.

मोहंमद पैगंबरांनी दिलेला शांती–माणुसकीचा संदेश अन्य धर्मियांपर्यंत पोहोचवणे व शालेय मुलांना विशिष्ट धार्मिक संदेश देणारा बरकत पेन, ट्रेसिंगवर कोणत्याही पेन व पेन्सिलने कुराण शरीफ हा धार्मिक ग्रंथ स्वतः लिहिण्याचा अनुभव प्रत्येकाला देणे, प्रत्येक घरावर स्टीकर चिकटवून त्याद्वारे प्रेषितांच्या दीड हजाराव्या जयंतीचा संदेश देणे, यासारखे उपक्रम सुरू झाले आहेत.

५ सप्टेंबर १४४७ रोजी प्रेषित मोहंमद पैगंबर यांचा जन्म झाला. त्याआधी जगभरात सुरू असलेला रक्तपात, भांडणे, वाद, दुष्काळ व अन्य समस्या प्रेषितांच्या जन्मानंतर संपल्या व जगात शांतता निर्माण झाली. दुष्काळ संपला, रक्तपात थांबला, भांडणे–वादही संपले व झाडीझुडुपे फळा–फुलांनी बहरू लागल्याचे सांगितले जाते. या पार्श्वभूमीवर, ५ सप्टेंबर रोजी प्रेषित मोहंमद पैगंबर यांची १ हजार ५०० वी जयंती असल्याने ती उत्साहात साजरी करण्याचे नियोजन ऑल इंडिया रझा अकादमीने केले आहे. त्यासाठी अकादमीचे पदाधिकारी जागृतीसाठी देशभरात फिरत आहेत. नगरलाही नुकतेच रझा अकादमीचे संस्थापक–अध्यक्ष मौलाना अलहाज सईद नुरी, प्रवक्ते मौलाना अब्बास रीजवी, भिवंडीचे (मुंबई) अध्यक्ष मौलाना कारी अब्दुर रहमान, सचिव महंमद मुस्तफा रजाक यांच्यासह चकलांबा (बीड) येथील सय्यद महबूब कादरी, सय्यद जमील जानेमिया (जालना), शेख बाबर चाँद, मौलाना शाहिद आले होते. येथील सिव्हील हडकोतील हाजी हमीद तकिया ट्रस्टच्यावतीने साबीर अली सय्यद यांनी त्यांचे स्वागत केले. व हाजी हमीदोदिन शहा यांच्या दर्ग्याचे संदर्भ देखील करण्यात आले व त्यानंतर मौलाना नुरी यांनी माध्यमांशी संवाद साधला व प्रेषित मोहंमद पैगंबराच्या दीड हजाराव्या जयंतीनिमित्त देशभर रझा अकादमीद्वारे होत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. सोलापूर, मालेगाव, गुलबर्गा, हैदराबाद, जालना, मुंबई, भिवंडी येथे बैठकीतून महिती दिली आहे व तेथे अन्नदानासह, रक्तदाब–मधुमेह–हृदयविकार व अन्य आजारांवरील औषधे मोफत वाटपास सुरु झाली आहेत, असेही त्यांनी सांगितले.

१ जानेवारीपासून पुढे वर्षभर जन्मलेल्या मुलांना मोहंमद नाव ठेवण्याचे आवाहन केले असून, आतापर्यंत पाचशेवर मुलांना असे नाव ठेवले गेले आहे. देशभरातील शाळा–महाविद्यालये, विद्यापीठ, ग्रंथालये, अतिथीगृह, रुग्णालयांना मोहंमद हे नाव देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. असे आवाहन जगभरातील मुस्लिम राष्ट्रांनाही पत्र पाठवून करण्यात आले आहे व त्यांनीही त्यांच्या देशातील या सुविधांना पैगंबरांचे नाव देण्याचे सांगण्यात आले असून ५ सप्टेंबर रोजी प्रत्येक मुस्लिम कुटुंबाने आपल्या घरावर धर्माचा ध्वज फडकावा व त्या दिवशी सर्वांनी एकत्र येऊन आनंदोत्सव साजरा करण्याचेही सांगण्यात आले आहे. मोहंमद पैगंबरांनी दिलेला शांती, प्रेम, माणुसकी, सद्भाव संदेश विविध उपक्रमांतून समाजापर्यंत पोहोचवण्याचेही प्रयत्न असून, यातही समाजाने उत्साहाने सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### पुस्तक व पेन देणार

मोहंमद पैगंबर यांच्या जीवन चरित्रावरील सिरते मुस्तफा हे ३०० रुपयांचे पुस्तक १०० रुपयांमध्ये प्रत्येकाला दिले जाणार आहे. तसेच शिक्षण घेत असलेल्या मुलांना धार्मिक संदेश असलेला बरकत पेन दिला जाणार आहे. अभ्यास करताना वा परीक्षेला जाताना या पेनाचा त्यांनी उपयोग करण्याचेही आवाहन केले गेले आहे. मुस्लिम समाजाचा धर्मग्रंथ कुराण शरीफ प्रत्येक घरात पोहोचवताना हा धर्मग्रंथ स्वतः लिहिण्याचा आनंद मिळावा यासाठी त्याची ट्रेसिंग प्रत प्रत्येकाला दिली जाणार आहे. त्यातील अक्षरांवर पेन वा पेन्सिलने गिरवण्यातून धर्मग्रंथ लिखाणाचा आनंद प्रत्येकाला घेता येणार आहे. प्रेषित मोहंमदांच्या जीवन चरित्रावर शालेय विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा घेण्यात येणार आहेत. या जन्मोत्सवानिमित्त विशिष्ट स्टीकर तयार केले असून, ते घराघरावर लावले जाणार आहे. ५ सप्टेंबर रोजी पैगंबर जयंती महोत्सव होणार असून त्याचे नियोजन सुरू असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

# ‘एक भारत, श्रेष्ठ भारत’ संकल्पनेस अनुसरून नगरमध्ये ‘राष्ट्रीय एकात्मता व सांस्कृतिक युवा शिबिराचे’ आयोजन

**देशभरातील युवक-युवती अहिल्यानगरमध्ये देणार राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश**

नगर – युवान व राष्ट्रीय युवा योजनाच्या वतीने २ ते ७ फेब्रुवारी या काळात ‘एक भारत, श्रेष्ठ भारत’या संकल्पनेस अनुसरून ‘राष्ट्रीय एकात्मता व सांस्कृतिक युवा शिबिराचे’ आयोजन करण्यात आले असल्याची माहिती शिबिराचे स्वागताध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार आणि आयोजन समितीचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी दिली.

ज्येष्ठ समाजसेवक स्वर्गीय डॉक्टर एस एन सुब्बाराव यांच्या ९६ व्या जयंतीनिमित्त’आयोजित या शिबिरात देशभरातील २८ राज्यातील सुमारे ४०० युवक युवती सहभागी होणार आहेत. २ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजता या शिबिराचे उद्घाटन होणार आहे. याप्रसंगी देशभरातील युवक- युवती आपल्या राज्यातील कला संस्कृतीचे दर्शन घडवतील. शिबिर कालावधीत भाषा संस्कृती यांचे आदान, प्रदान, नगर शहरात विविध भागात श्रमदान, सद्भावना रॅली, सांस्कृतिक कार्यक्रम यांचे नियोजन केले असल्याची माहिती शिबिराचे मार्गदर्शक सुवालाल शिंगवी, अध्यक्ष संदीप कुसळकर यांनी दिली.

४ फेब्रुवारी रोजी घर घर लंगर या संस्थेच्या वतीने माऊली संकुल येथे सायंकाळी ६ वाजता, तर ५ फेब्रुवारी रोजी मोने कला मंदिर येथे अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने सर्वधर्म प्रार्थना व राष्ट्रीय एकात्मतेवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यात आले आहे. ६ फेब्रुवारी रोजी एक दिवस आपल्या सैनिकांसाठी या एम. आय. सी एस. येथे युवानच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. याप्रसंगी लष्कराचे वरिष्ठ अधिकारी व २००० सैनिक आपल्या परिवारासह उपस्थित राहणार असल्याचे कॅप्टन प्रा. प्राजक्ता भंडारी व संयोजिका गीतांजली भावे यांनी सांगितले.

या शिबिरात रामचंद्र मिशन हार्टफुलनेस केंद्र व योगविद्या धाम यांच्या वतीने ध्यान व योग साधना, श्रमदान, भाषिक वर्ग, तज्ञांचे मार्गदर्शन, सामूहिक खेळ, ऐतिहासिक वास्तूंना भेट देण्यासाठी नगर दर्शन उपक्रम सप्ताह काळात होणार आहेत. देशभरातील प्रेरणादायी कार्य करणारी नामवंत सामाजिक कार्यकर्ते, तज्ञ या शिबिरात येऊन मार्गदर्शन करणार आहेत. शिबिराचा समारोप ७ फेब्रुवारी होणार आहे. या शिबिरामध्ये नगर जिल्ह्यातील विविध महाविद्यालये, शाळा, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर महापालिका, राष्ट्रीय सेवा योजना, विविध स्वयंसेवी संस्था सहभागी होणार आहेत.

या शिबिरात सहभागी व्हावे असे आवाहन पोपटराव पवार, नरेंद्र फिरोदिया, सुवालाल शिंगवी, गिरीश कुलकर्णी, अॅड.श्याम असावा, नरेंद्र वडगावकर, संजय गुगळे, हेमंत लोहगावकर, प्रा. गणेश निमसे, रुपेश पसपुल व सचिव सुरेश मैड यांनी केले आहे.



राष्ट्रीय संगीत स्पर्धेत हिंदुस्थानी गायन प्रकारात लहान गटामध्ये माध्यमिक आश्रमशाळा ढवळपुरी (ता.पारनेर) येथील शाळेची विद्यार्थिनी कु. स्वराली जाधव हिला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

# राष्ट्रीय शास्त्रीय गायन स्पर्धेत स्वराली जाधव प्रथम



नगर – मधुकंस व गांधर्व महाविद्यालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय संगीत स्पर्धेत हिंदुस्थानी शास्त्रीय गायन प्रकारात लहान गटामध्ये माध्यमिक आश्रमशाळा ढवळपुरी ता. पारनेर जि. अहिल्यानगर या शाळेची विद्यार्थिनी कु. स्वराली रमेश जाधव हिला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. ट्रॉफी प्रमाणपत्र आणि रोख रक्कम असे बक्षिसाचे स्वरूप होते.

तसेच छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित राज्यस्तरीय भक्तीगीत गायन स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक स्वरालीला मिळाले. त्याचप्रमाणे कोल्हापूर येथे आयोजित राज्यस्तरीय नाट्यगीत व भावगीत गायन स्पर्धेमध्ये ही स्वरालीला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. स्वराली सध्या इ.दहावी मध्ये शिकत असून प्रा. आर.एन. भनगडे यांच्याकडे शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेत आहे. तिला पुणे येथील राष्ट्रीय संगीत स्पर्धेत स्वराली प्रथम, ढवळपुरीची स्वराली जाधव पुणे येथील राष्ट्रीय संगीत स्पर्धेत प्रथम, सलग तीन राज्यस्तरीय स्पर्धेत स्वरालीला पारितोषिके, हिंदुस्तानी शास्त्रीय गायन प्रकारात स्वराली प्रथम, तीन वेगवेगळ्या स्पर्धेमध्ये स्वरालीला पारितोषिके मिळाले आहे.




अहिल्यानगर येथील डॉ. पाऊलबुधे फार्मसी कॉलेजमध्ये प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचे स्वागत करून मिस फ्रेशर्स, मिस्टर फ्रेशर्स यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे दादासाहेब भोईटे, प्राचार्या डॉ.रेखा राणी खुराणा, अनुराधा चव्हाण, डॉ. श्याम पंगा, डॉ. वेणु कोला, भरत बिडवे, अनिता सिद्दम आदी (छाया – विजय मते)

# डॉ.पाऊलबुधे फार्मसी कॉलेजमध्ये प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचे स्वागत

नगर – अहिल्यानगर येथील वसंत टेकडी जवळील डॉ.ना.ज.पाऊलबुधे कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचे स्वागत उत्साहात करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करून स्वागत करण्यात आले. यामुळे सर्व विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत झाला होता.

या स्वागत समारंभास सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष राम बुचकुल, सचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे, प्रशासक अधिकारी डॉ.श्रद्धा पाऊलबुधे, बीएडच्या प्राचार्या डॉ.रेखा राणीखुराणा, बी फार्मसी चे प्राचार्य डॉ.श्याम पंगा, डी.फार्मसी प्राचार्या अनुराधा चव्हाण, डॉ.वेणु कोला, माध्यमिकचे प्राचार्य माध्यमिकचे प्राचार्य भरत बिडवे प्राथमिकच्या मुख्याध्यापिकाअनिता सिद्दम, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचे स्वागत करताना मिस् फ्रेशर्स आणि मिस्टर फ्रेशर्स निवडण्यात आले. यामध्ये मिस फ्रेशर्स ऐश्वर्या पठारे तर मिस्टर फ्रेशर्स प्रमोद बाचकर डी फार्मसीमध्ये फ्रेशर्स बुशीरा इनामदार तर मिस्टर फ्रेशर्स प्रणव माने यांची निवड करण्यात आली. स्टुडन्ट कॉन्सिल घेण्यात आली. यामध्ये ईशान चिंतामणी अध्यक्ष तर आदिती पवार हिची जनरल सेक्रेटरी म्हणून निवड करण्यात आली. स्वागत समारंभ कार्यक्रम सांगता सर्व विद्यार्थ्यांना स्नेहभोजन देऊन करण्यात आली.

# आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अहिल्यानगरमधील महिलांना ८ मार्च रोजी मिळणार पुरस्कार

**श्रीमती इचरजबाई हस्तीमल मुनोत पुरस्कारासाठी नामनिर्देशन अर्ज करण्याचे आवाहन**



नगर – येथील श्री केशरचंद गुलाबचंद मुनोत नेवासकर सार्वजनिक ट्रस्ट संचलित के. जी. कला व वाणिज्य महाविद्यालयातर्फे स्वर्गीय श्रीमती इचरजबाई हस्तीमल मुनोत पुरस्कारासाठी नामनिर्देश मागविण्यात येत आहेत. हा पुरस्कार अहिल्यानगर शहरातील आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आदी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना ८ मार्च रोजीच्या कार्यक्रमात देण्यात येणार आहे. स्व. श्रीमती इचरजबाई या दूरदृष्टीचे अध्वर्यू हस्तीमल मुनोत त्यांच्या पत्नी होत्या. त्या सामाजिक प्रगती व महिला सक्षमीकरणाच्या उत्तम प्रतीक होत्या. या पुरस्काराच्या माध्यमातून त्यांच्या परंपरेला पुढे नेणाऱ्या आणि समाजात सकारात्मक योगदान देणाऱ्या महिलेचा सन्मान करण्यात येणार आहे. उद्योजकता, समाजसेवा, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात लक्षणीय कामगिरी करणाऱ्या महिलांनी आपल्या योगदानाचा तपशील असलेला फॉर्म व प्रस्ताव सादर करावा. अर्जासोबत त्यांच्या कामगिरीचा पुरावा जसे की, प्रमाणपत्रे, पुरस्कार, संबंधीत वृत्तपत्रीय कात्रणे इ. जोडणे आवश्यक आहे. ज्या इच्छुक महिलेस हा पुरस्कार मिळवायचा आहे. त्यांनी तसा विस्तृत प्रस्ताव आणि संबंधित पुरावे १५ फेब्रुवारीपर्यंत प्रा. डॉ. स्वाती मुनोत के.जी. कला व वाणिज्य महाविद्यालय, पंडित नेहरू हिंदी विद्यालय कॅम्पस, किल्ला मैदानाजवळ, अहील्यानगर येथे तसेच महाविद्यालयाचा Mail ID- kg.college@yahoo.com यावर पाठवावेत.

हा पुरस्कार त्या त्या क्षेत्रात लक्षणीय योगदान देणाऱ्या महिलेच्या यशाचा आणि समर्पणाचा सन्मान करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. अशा लक्षणीय कार्य करणाऱ्या महिलेच्या कार्याचा गौरव करूयात आणि भविष्यातील पिढ्यांसाठी एक समृद्ध असा वारसा निर्माण करूयात.

# हिंदू धर्मातील अतिशय महत्व असलेल्या शास्त्रोक्त ‘नर्मदा परिक्रमेचे’ आयोजन

नगर – हिंदू धर्मातील अतिशय महत्व असलेल्या शास्त्रोक्त नर्मदा परिक्रमेचे २५ फेब्रुवारी ते १२ मार्च दरम्यान आयोजन करण्यात आले. हि संपुर्ण परिक्रमा बसने होणार असल्याची माहिती अभिजित पोळ यांनी दिली.

श्री नर्मदा परिक्रमा नर्मदेच्या काठाकाठाने केलेली प्रदक्षिणा म्हणजेच श्री नर्मदा परिक्रमा ही एक धार्मिक यात्रा आहे. यात्रा धार्मिक अंगाने केली जात असली तरी वाटेत भेटणारा निसर्ग, मैय्याच खळाळत आपल्या सोबतच वाहणारं पाणी, असंख्य मंदिरे, आखीव-रेखिव बांधलेले घाट, साधेभोळे पण मैय्यावर निस्सिम श्रध्दा असलेले तिकडचे रहिवासी हे सगळेच परिक्रमावसियांना अंतर्मुख तर करतेच पण बरंच काही शिकवून जाते. ही परिक्रमा म्हणजे मानसिक, शारीरिक व आध्यात्मिक तप आहे. परिक्रमा पायी केली काय आणि वाहनाने केली काय मैय्यासाठी सगळे परिक्रमावासी सारखेच आणि तिची लेकरेच. म्हणुनच या आईच प्रेम अनुभवायच असेल तर आपण एकदा तरी नर्मदा परिक्रमा केलीच पाहिजे.

परिक्रमेतील धार्मिक स्थळे – उज्जैन, ओंकारेश्वर, लेपा, शुलपाणेश्वर, कुंभेश्वर, भालोद, विमलेश्वर, मिठीतलाई, निलकंठेश्वर, नारेश्वर, गरूडेश्वर, महेश्वर, मंडलेश्वर, नेमावर, जबलपुर, अमरकंटक, महाराजपूर, नरसिंहपूर, खांडवा, होशंगाबाद अजून मधील सर्व मार्गातील स्थळपूर्ण यात्रा एअर सस्पेन्शन स्लिपर कोच बसने आहे.

ज्येष्ठ नागरिकांना विशेष सवलत अधिक माहितीसाठी अभिजीत पोळ मो. नं.९४२२२२७९०६, नंदकुमार पोळ मो. नं. ७८७५५०००५६ यांच्याशी संपर्क साधावा.

**भक्तीचा सुगंध सर्वत्र पसरवीत ५८ व्या निरंकारी संत समागमाची सांगता**

# मानवी गुणांनी युक्त असणे हीच मानवाची खरी ओळख होय

**सद्गुरु माता सुदिक्षा जी महाराज**



संत निरंकारी मिशनच्या वतीने पिंपरी, पुणे येथे नुकत्याच झालेल्या ५८ व्या महाराष्ट्र वार्षिक निरंकारी संत समागमाची क्षण चित्रे. (द्वारा – किशोर खुबचंदानी)

नगर – मनुष्य रुपात जन्म प्राप्त केल्यानंतर मानवीय गुणांनी युक्त असणे ही मानवाची खरी ओळख होय असे उद्गार सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी पिंपरी, पुणे येथील मिलिटरी डेरी फार्मच्या चारशे एकरच्या विशाल मैदानावर आयोजित महाराष्ट्राच्या ५८ व्या ३ दिवसीय वार्षिक निरंकारी संत समागमात देश विदेशातील उपस्थित भाविकांपुढे व्यक्त केले. यात महाराष्ट्राच्या कानाकोपर्यातून तसेच नगर क्षेत्र अंतर्गत येणाऱ्या ६ जिल्ह्यातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सद्गुरु माताजी यांनी पुढे सांगितले की, विज्ञान व तंत्रज्ञानाच्या आधारे संसारिक उपलब्धींच्या बाबतीत मानवाने खूपच प्रगती केली आहे. जेव्हा सद्बुद्धीने युक्ती होऊन याचा वापर केला जातो. तेव्हा तो निश्चितच मानवांसाठी शांती सुखांचा कारण बनतो परंतु जर त्याच्या दुरुपयोग केला गेला तर हीच उपलब्धी मानवांसाठी नुकसानकारक ठरतात. ब्रह्मज्ञानाद्वारे जेव्हा परमात्माला जीवनात धारण केले जाते, तेव्हा सहजपणे मानवाला सुमती प्राप्त होते. व त्याच्या मनातील भेदभाव आप-परभाव नाहीसा होतो. आणि प्रत्येक मानवासाठी त्याच्या मनात परोपकाराचा भाव उत्पन्न होतो. शेवटी माताजींनी सांगितले की, मानवाने शुद्ध भावनेने या निराकार परमात्माला आपल्या हृदयामध्ये स्थान द्यावे ज्यायोगे प्रत्येक मानवाच्या प्रति त्याच्या मनामध्ये प्रेम व सेवेचा भाव उत्पन्न होऊ शकेल.

**तीन दिवसीय समागमाची क्षणचित्रे**

**शोभायात्रा :** पहिल्या दिवशी सकाळच्या सत्रात सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज व निरंकारी राजपिता रमितजी यांच्या दिव्य आगमनाचे अवचित साधून श्रद्धालु भक्तांनी एका भव्य शोभायात्रेचे आयोजन केले. यात अनेकतेत एकतेचे सुंदर दर्शन घडवीत मिशनच्या शिकवणूकीवर आधारित विविध संस्कृतींचे उद्भुत मिलन दर्शविणाऱ्या चित्ररथांद्वारे सादर करीत भक्तांनी पारंपारिक वेशभूषेत नृत्य गीतांचे सादरीकरण केले या प्रस्तुती सादर करणाऱ्यांमध्ये छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर,पुणे, नाशिक, सातारा, मुंबई, कोल्हापूर, धुळे, नागपूर, रायगड, सोलापूरसह हैदराबाद, पंजाब येथील भक्तांनी सहभाग घेतला. तदनंतर फुलांनी सुसज्जित खुल्या वाहनातून दिव्य युगुलाला समागम मंडपाच्या मुख्य मंचापर्यंत देण्यात आले. यावेळी उपस्थित भाविकांनी ‘धन निरंकार’ याचा जयघोष करीत सद्गुरुंचे हात जोडून अभिवादन केले. शोभायात्रे नंतर दुपारी मुख्य सत्संग कार्यक्रमाला सुरुवात झाली. यात अनेक वक्त्यांनी, भक्तांनी गीत, भजन, अभंग, कविता आधी द्वारे सद्गुरु आणि निरंकार परमात्मा विषयी आपल्या मनातील भावना व्यक्त केल्या तसेच बाल कवींचे लघु कवी संमेलन पार पडले. यात हिंदी, मराठी व इंग्रजीत त्यांनी ‘विस्तार-अनंताच्या दिशेने’ या विषयावर कविता सादर केल्या. शेवटी सद्गुरु माताजींचे उद्बोधक प्रवचन झाले.

**सेवादल रॅली :** समागमाच्या दुसर्या दिवशी सकाळच्या सत्रात एक भव्य सेवादल रॅली आयोजित करण्यात आली. ज्यामध्ये हजारोंच्या संख्येने महिला व पुरुष स्वयंसेवकांनी आपापल्या खाकी व निळी वर्दीमध्ये सुसज्जित होऊन भाग घेतला या रॅलीमध्ये मिशनच्या शिकवणूकीवर आधारित लघु नाटिकेचे सादरीकरण सेवादल द्वारे करण्यात आले. ज्याच्या माध्यमातून भक्तीमध्ये सेवेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. शेवटी सद्गुरु माताजींनी प्रवचनातून सेवा दलाला मर्यादा, अनुशासन तसेच मानवसेवे विषयी मार्गदर्शन करीत आशीर्वाद प्रदान केले. दुपारी मुख्य सत्संग कार्यक्रमाला सुरुवात झाली. सत्राच्या शेवटी राजपिता रमितजी तसेच सद्गुरु माताजींचे अमृततुल्य प्रवचने झाली. दरम्यान या सत्रात अनेक महिला कवींनी विविध भाषेत काव्य पाठ करीत मिशनचा दिव्य संदेश प्रसारित केला.

**तिसरा दिवस :-** दुपारी एक वाजेपासून सत्संगचा मुख्य कार्यक्रम सुरू झाला. यात अनेकांनी गीत, भजने, अभंग आदि द्वारे आपले जीवनाचे अनुभव कथन करीत परमात्मा विषयी तसेच सद्गुरुंची मानवी जीवनातील आवश्यकता तसेच मानवी जीवनाचा उद्देश आधी विषयांवर प्रकाश टाकला. समागमाचा समारोपप्रसंगी सद्गुरु माताजींनी उपस्थित भाविकांना मार्गदर्शन करीत सांगितले की, जीवनाचा उद्देश केवळ भौतिक प्रगतीमध्ये नसून, अध्यात्मिक उन्नतीमध्ये सामावलेले असून, क्षणोक्षणी परमात्म्याशी संलग्न राहून जीवन योग्य दिशेने व्यतीत केल्यानेच आपल्याला अध्यात्मिक शांती मिळू शकते आणि आम्ही आनंदाच्या दिशेने अग्रेसर होऊ शकतो.

समागमस्थळी भव्य अशी निरंकारी प्रदर्शनी उभारण्यात आली होती. यात मिशनचा इतिहास, विचारधारा व सामाजिक उपक्रमांची सचित्र माहिती देण्यात आली होती. या समागमस्थळी डिस्पेंसरी, लंगर, कॅन्टीन, प्रकाशन, कायरो थेरपी, पिण्याचे पाणी आदींसह भाविकांसाठी अत्यावश्यक सुविधा करण्यात आल्या होत्या. सेवादल महिला व पुरुष सदस्याद्वारे स्मितहास्यांने, निष्कामपणे सर्वत्र सेवा प्रदान करीत होते.




सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले.

# स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास होतो

**अॅड. सुरेश लगड यांचे प्रतिपादन; सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आयोजित स्पर्धांचे बक्षीस वितरण**

नगर – स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास होतो, बुद्धीला चालना मिळते. खेळातून खेळाडूवृत्ती जोपासली जाते. आकलन क्षमता विकसित होते व आत्मविश्वास वाढते. म्हणून विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन विचारशक्तीला चालना देण्याचे आवाहन विशेष जिल्हा सरकारी वकील अॅड. सुरेश लगड यांनी केले.

सामाजिक न्याय मंत्रालय अंतर्गत डॉ. आंबेडकर फाउंडेशन (नवी दिल्ली) व जय युवा अॅकॅडमी आयोजित सावित्रीबाई फुले जयंती उत्सव अंतर्गत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेच्या बक्षीस वितरणप्रसंगी अॅड. लगड बोलत होते. यावेळी मनपा माजी स्थायी समितीचे माजी सभापती किशोर डागवाले, मेजर भीमराव उल्हारे, शाहीर कान्हू सुंबे, नोटरी पब्लिक अॅड. महेश शिंदे, जय युवाच्या सचिव जयश्री शिंदे, अनंत द्रविड, अनिल साळवे, आरती शिंदे आदी उपस्थित होते.

किशोर डागवाले म्हणाले, लोककलेतून सामाजिक जनजागृती होते. सावित्रीबाई फुले यांचे जीवनकार्य पारंपारिक लोककलावंतांच्या माध्यमातून समाजासमोर आणता येते. देशाच्या विविध संस्कृतीचे दर्शन घडविणारे उपक्रम राबविले पाहिजेत. सांस्कृतिक कार्यक्रम हे समाज प्रबोधनाचे महत्त्वाचे माध्यम असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित पाहुण्यांनी सावित्रीबाई फुले यांचे समाजकार्यातील योगदान व शिक्षण क्षेत्रातील क्रांती या विषयावर माहिती दिली. सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या प्रश्नमंजुषा, निबंध, वक्तृत्व, हस्ताक्षर, चित्रकला, वैयक्तिक नृत्य, समूह नृत्य स्पर्धांचा निकाल जाहीर करण्यात आला.

सांस्कृतिक कार्यक्रमात मंदाताई फुलसौंदर यांनी प्रबोधन पर गीते सादर केली. स्वप्निल गायकवाड यांनी भेदिक कला, प्रकाश शिंदे यांनी बहुरूपी, दत्तू वाजे यांनी वाघ्या-मुरळी, संपत ससे, नारायण ससे यांनी भक्ती गीते सादर केली. सांस्कृतिक कार्यक्रमाचे संयोजन शाहीर कान्हू सुंबे यांनी केले होते. विजेत्यांना प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

सावित्रीबाई फुले जयंती उत्सव सादरीकरणासाठी राजकुमार चिंतामणी, श्रीनिवास नागुल, संतोष लयचेट्टी, रवी वाघ, मिया सय्यद, हमीदभाई शेख, प्रा. हर्षल आगळे, डॉ. संतोष गिन्हे, डॉ. भास्कर रणनवरे, पोपट बनकर, अश्विनी वाघ, कावेरी कैदके, अॅड. पुष्पा जेजुरकर, विद्या शिंदे, रजनीताई ताठे, उज्वला उल्हारे, बाबू काकडे, कांचन मधे, सुवर्णा कैदके, मीना म्हसे, कल्याणी गाडळकर, गौतम कुलकर्णी, रोहिणी थोरात, शिवाजी वेताळ, रावसाहेब काळे, विनोद साळवे, निलेश रासकर, रावसाहेब मगर, गणेश बनकर, सुभाष जेजुरकर आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन अनंत द्रविड यांनी केले. आभार दिनेश शिंदे यांनी मानले.

स्पर्धांचा निकाल – निबंध स्पर्धा प्रथम- समीक्षा सवाई, द्वितीय- खंडू फुंदे, तृतीय- अंकिता निमसे.

चित्रकला स्पर्धा प्रथम- ऋतुजा शिंदे, द्वितीय- देवयानी काटे, तृतीय- जयश्री कोल्हे.

हस्ताक्षर स्पर्धा प्रथम- भूषण कैदके, द्वितीय- प्रीती खैरे, तृतीय- श्रद्धा गायकवाड.

वक्तृत्व स्पर्धा प्रथम- सानिका खैरे, द्वितीय- प्रिया झपके, तृतीय- संस्कृती कोतवाल.

वैयक्तिक नृत्य प्रथम- सौरभ खताडे, द्वितीय- राजेश्वरी किल्लोर, तृतीय- श्रुती खळदकर.

समूह नृत्य स्पर्धा प्रथम-ऑक्झिलियम हायस्कूल, द्वितीय-शासकीय परिचर्या महाविद्यालय, तृतीय-शिंगवे नाईक महिला मंडळ.

प्रश्नमंजुषा स्पर्धा प्रथम- तुषार शेंडगे, द्वितीय- अमोल तांबडे, तृतीय- जयेश शिंदे.

# भक्तांबर जाप मंडळाचे १ फेब्रुवारी रोजी अधिवेशन

श्रीरामपूर – श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ तसेच श्री तिलोकरत्न जैन धार्मिक परीक्षा बोर्ड अहिल्यानगर यांच्यावतीने १ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता श्री प्रमोद भक्तांबर जाप मंडळाचे अधिवेशन आयोजित करण्यात आल्याची माहिती संयोजकांनी दिली.

आनंदधाम अहिल्यानगर येथे हे अधिवेशन महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी, प्रबुद्ध विचारक आदर्शऋषिजी, संस्कार दिवाकर आलोकऋषिजी, मधुरभावी सत्यप्रभाजी, स्वाध्यायप्रेमी दिव्यदर्शनाजी, प्रवचन कौशल्य विश्वदर्शनाजी आदी साधु-संतांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. विश्वदर्शनाजी म. सा. यांनी श्री प्रमोद भक्तांबर जाप मंडळाचे स्थापनेमागील हेतू स्पष्ट करतांना सांगितले की, जी साधना गुरूमाऊलीला खूप प्रिय होती. त्या साधनेचा अखंड अविरत प्रवाह असा वाहत राहिला पाहिजे. सम रुपाने जी साधना नाम, जप केला जातो. त्याची दिव्य शक्तीची प्रचिती आल्याशिवाय राहत नाही. एकमुखाने, एक स्वराने, ध्यान अवस्थेत होणारा हा जप यज्ञ देश, राष्ट्र, राज्य व जिल्हा पातळीवरती गावागावात होत राहिला तर देशात शांतीचे साम्राज्य होईल व जनता सुखाने आनंदाने जीवन जगेल, ही महत्वपूर्ण भावना या मागे आहे.

भक्तांबर मंडळाची स्थापना गावोगावी झाली आहे. ज्यांच्या दीक्षाला पंचाहत्तर वर्ष पूर्ण होत आहे. त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी ५४ ठिकाणी बनविलेले हे सर्व मंडळे अधिवेशनाच्या रुपाने एकत्रित येवून जप साधना, विचार विशर्म आणि साधु-साध्वींचे उद्बोधन या अधिवेशनात होणार आहे. या जाप अधिवेशनासंदर्भात लोणी येथील सौ. ज्योती गांधी, (मोबा. ९६५७८६७५८३) व अहिल्यानगर येथील सौ. मनिषा मुनोत (मोबा. ९४२३७९१५०५) यांना संपर्क साधावा. श्री जय आनंद गुरूभक्त मंडळाच्या वतीने गौतम प्रसादीचे आयोजन करण्यात आले आहे. अधिवेशनासाठी मंडळाच्या सदस्यांनी उपस्थित रहावे.

## चित्रकला स्पर्धेत अक्षय वैद्य याला प्रथम पारितोषिक



नगर – नुकत्याच पार पडलेल्या २४ व्या पार्ले महोत्सवात (मुंबई) चित्रकला स्पर्धेत विशेष गटात अक्षय वैद्य याला प्रथम पारितोषिक आ. पराग अळवणी यांच्या हस्ते मिळाले.

# अहमदनगर महिला मंडळाची ३१ जानेवारी रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा

नगर – अहमदनगर महिला मंडळ दिल्ली गेट ह्या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा ३१ जानेवारी रोजी दिल्ली गेट येथे, सायंकाळी ५ वाजता महिला मंडळ संस्थेच्या हॉल मध्ये आयोजित करण्यात आली आहे. सर्व आजीव सभासदांनी उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यक्ष सौ. ज्योती केसकर, सचिव प्रा.सौ ज्योती कुलकर्णी ह्यांनी केले आहे.

# अहिल्यानगर महापालिकेच्यावतीने शहरात ‘कुष्ठरुग्ण शोध अभियान’

**कर्मचाऱ्यांच्या पथकांमार्फत घरोघरी जाऊन तपासणी करत माहिती संकलन करणार; कुष्ठरोग निर्मुलनाच्या दिशेने वाटचाल हे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न : आयुक्त यशवंत डांगे**

नगर – कमीत कमी कालावधीत समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण शोधून त्यांना उपचाराखाली आणणे व कुष्ठरोगाबाबत समाजात जनजागृती करणे या उद्देशाने केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ३० जानेवारी ते १४ फेब्रुवारी या कालावधीत अहिल्यानगर शहरात कुष्ठरुग्ण शोध अभियान ही मोहीम महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत आहे. कुष्ठरोग दुरीकरणाचे ध्येय साध्य करून कुष्ठरोग निर्मुलनाच्या दिशेने वाटचाल करणे हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार ही मोहीम हाती घेण्यात आल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.

महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत ही मोहिम राबविण्यात येणार असून महापालिका कर्मचाऱ्यांच्या पथकांच्या माध्यमातून विविध घरातील नागरिकांची भेट घेऊन, नागरीकांची तपासणी करून जनजागृती करणार आहे. घरांना प्रभावीपणे भेट देऊन माहिती संकलीत होईल, अशा प्रकारे पथके तयार केली जात आहेत.

प्रत्येक पथकामध्ये महिला व पुरूष कर्मचारी असणार आहेत. प्रत्येक घरातील महिलांची तपासणी महीला कर्मचाऱ्यामार्फत आणि पुरुषांची तपासणी पुरूष कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात येणार आहे. कुष्ठरोगाकरीता त्वचेवर फिकट/लालसर बधीर चट्टा, त्याठिकाणी घाम न येणे, जाड, बधीर तेलकट/चकाकणारी त्वचा, त्वचेवर गाठी असणे, कानाच्या पाळ्या जाड होणे, भुवयांचे केस विरळ होणे, डोळे पूर्ण बंद न करता न येणे आदी लक्षणे विचारुन तपासणी होणार आहे. यामध्ये कुष्ठरोगाची लक्षणे आढळल्यानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे निदानासाठी संदर्भित करण्यात येणार आहे. महानगरपालिका कार्यक्षेत्रात शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शहराची निवड केली असून यामध्ये झोपडपट्टी, बांधकाम मजूर, दगडखाणी इत्यादी भागाचा समावेश केला आहे.

या अभियानामुळे समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधून त्यांना त्वरीत बहूविध औषधोपचाराखाली आणणे, नवीन सांसर्गिक कुष्ठरुग्ण शोधून बहूविध औषधोपचाराद्वारे संसर्गाची साखळी खंडित करून होणारा प्रसार कमी करणे, कुष्ठरोग दुरीकरणाचे ध्येय साध्य करून कुष्ठरोग निर्मुलनाच्या दिशेने वाटचाल करणे हे उद्दिष्ट साध्य करण्यात येणार आहे. या मोहिमेमध्ये नागरिकांनी प्रतिसाद देऊन स्वत:ची कुष्ठरोगाबाबत तपासणी करुन उद्दिष्ट साध्य करण्यात सहकार्य करावे, असे आवाहन यशवंत डांगे यांनी केले आहे.

## प्रजासत्ताकदिनी प्रभाकरम फाउंडेशनमार्फत वृक्षारोपण करून निसर्ग संवर्धनाचा ध्यास


प्रभाकरम फाउंडेशन यांच्यामार्फत कर्जत तालुक्यातील खांडवी या गावात कान्होबा डोंगर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

नगर – प्रभाकरम फाउंडेशन यांच्यामार्फत कर्जत तालुक्यातील खांडवी या गावात कान्होबा डोंगर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपणासोबतच तरुणांनी वृक्षसंवर्धन करण्याचा ध्यास घेतला. संवर्धनासाठी तरुणांनी प्रतिज्ञा घेत वृक्षांची देखभाल व पालनपोषण करेल, असा निश्चय केला.

दरम्यान, ग्लोबल वॉर्मिंगमुळे वातावरणात कमालीचा बदल झाला आहे. मानवी आक्रमणामुळे जंगलतोड वाढल्याने वन्यजीव, पशुपक्षी वातावरणाला धोका निर्माण झाला आहे. वृक्षतोड हे याचे प्रमुख कारण आहे. परिणामी, अलीकडे मानवाला याचे महत्त्व कळले असून, वृक्षारोपण करण्याकडे अधिकाधिक भर दिला जात आहे. वृक्षारोपण हे महत्त्वाचे आहेच. पण, त्यासोबत त्याचे संवर्धन ही खरी काळाची गरज आहे. वृक्षाचे संवर्धन झाले तरच भविष्यातील पर्यावरण अबाधित राहील.

यावेळेस संस्थेचे विपुल तापकीर, प्रशांत तापकीर, संदीप तापकीर, जलज पाडळे, अभिषेक थोरात, संकेत तापकीर, दिनेश पांढरे, सौरभ गावखरे आदी उपस्थित होते.

# अहमदनगरच्या नामांतराविरोधात औरंगाबाद खंडपिठात ‘याचिका’

**खंडपीठाकडून केंद्र व राज्य शासन, विभागीय आयुक्त, महापालिकेला नोटिसा**

नगर – अहमदनगरच्या नामांतर प्रस्तावाला आव्हान देणारी जनहित याचिका माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे, डॉ. पुष्कर सोहनी व आर्किटेक्ट अर्शद शेख यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) खंडपीठात दाखल केलेली आहे. न्यायमूर्ती मंगेश पाटील व न्यायमूर्ती प्रफुल्ल कुभाळकर यांच्या खंडपीठाने केंद्र शासन, राज्य शासन, विभागीय आयुक्त नाशिक व नगर महानगरपालिका यांना म्हणणे सादर करण्यासाठी नोटीस काढली आहे.

माजी कुलगुरू डॉ. निमसे, डॉ. सोहनी व आर्किटेक्ट शेख यांनी अहमदनगर शहराच्या नावासंदर्भात दाखल केलेली जनहित याचिका प्रलंबित असताना केंद्र शासनाने राज्य शासनाचा ठराव मंजूर केल्याने राज्य शासनाने १ ऑक्टोबर २०२४ व ४ ऑक्टोबर २०२४ रोजी कायदाच्या तरतुदींची पायमल्ली करून दोन शासन निर्णयाद्वारे शहर जिल्हा, उपविभाग, तालुक्याची नावे बदलण्यास मंजुरी दिल्याने याचिकाकर्त्यांनी प्रलंबित जनहित याचिकेत दुरुस्ती अर्ज सादर करून सदरील दोन्ही शासन निर्णय रद्द करण्याची मागणी केली आहे.

या जनहित याचिकेच्या सुनावणीच्या वेळेस याचिकाकर्त्यांतर्फे युक्तिवाद केला गेला की, अहमदनगर नामांतर प्रस्ताव महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने पारित केलेला नसून, तो प्रशासक यांनी राज्य शासनाच्या आदेशाने एकतर्फी घेतलेला प्रस्ताव आहे. राज्य व केंद्र शासनाने १ ऑक्टोबर २०२४ रोजी त्यास मान्यता दिली. परंतु, त्यानंतर कलम ४ (४) एमएलआरसी १९६६ नुसार जनसामान्यांनाकडून सदर नामांतरास आक्षेप व हरकती मागविणे कायद्यानुसार बंधनकारक असताना राज्य शासनाने विधानसभा २०२४ ची आचारसंहिता लागण्याच्या एक आठवडा आधी म्हणजे ४ ऑक्टोंबर २०२४ व ८ ऑक्टोंबर २०२४ रोजी अधिसूचना काढून अहमदनगरचे नामांतर अहिल्यानगर असे केले. जे बेकायदेशीर आहे. नामांतर करताना कायद्याच्या तरतुदींना व केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्वांना डावलल्याने सदर नामांतर आदेश रद्द करण्यात यावे. यावर उच्च न्यायालयातील प्रमुख सरकारी अभियोक्ता यांनी युक्तिवाद केला की, सर्व कायदेशीर बाबी विचारात घेऊन व सर्व प्रक्रियांचा अवलंब करूनच नामांतर करण्यात आलेले आहे. यापूर्वी अशाच प्रकारच्या प्रकरणात औरंगाबाद नामांतराची याचिका रद्द झालेली आहे. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकून खंडपीठाने केंद्र शासन, राज्य शासन, विभागीय आयुक्त नाशिक व नगर महापालिका यांना सदर जनहित याचिकेवर त्यांचे म्हणणे सादर करण्यासाठी नोटीस काढली आहे. पुढील सुनावणी चार आठवड्यानंतर ठेवण्यात आलेली आहे. याचिकाकर्त्यांतर्फे ज्येष्ठ विधिज्ञ राजेंद्र देशमुख व ताहेरअली कादरी हे काम पाहत आहेत.

# वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याबाबत जागृती

**पोलीस अधिकारी, स्वयंसेवी संघटनांचे प्रतिनिधी, महाविद्यालयाचे युवक-युवती उतरले रस्त्यावर**


शहर वाहतूक शाखा, नेहरू युवा केंद्र, उमेद सोशल फाऊंडेशन व प्रगत कला महाविद्यालयाच्या वतीने शहरात वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

नगर – शहर वाहतूक शाखा, नेहरू युवा केंद्र, उमेद सोशल फाऊंडेशन व प्रगत कला महाविद्यालयाच्या वतीने शहरात वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. डीएसपी चौकातील सिग्नलवर वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या नागरिकांना अपघात टाळण्यासाठी वाहतुकीचे नियम पाळण्याचे आवाहन करण्यात आले.

सडक सुरक्षा सप्ताहानिमित्त शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविण्यात आले. पोलीस अधिकारी, स्वयंसेवी संघटनांचे प्रतिनिधी, महाविद्यालयाचे युवक-युवतींनी रस्त्यावर उतरुन नागरिकांना वाहतुकीच्या नियमांची जाणीव करून देण्यात आली. यावेळी पोलीस उपनिरीक्षक शमुवेल गायकवाड, कॉन्स्टेबल खलाटे, पोलीस नाईक साठे, जय असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. महेश शिंदे, प्रगतकला महविद्यालयाचे प्राचार्य महावीर सोनटक्के, नुरील भोसले, दिनेश अष्टेकर, चंद्रकांत देठे, उमेद सोशल फाऊंडेशनचे अध्यक्ष अनिल साळवे, सचिव सचिन साळवी, विजय लोंढे, रवी साखरे, ॲड. दिपक धीवर, माहेर फाऊंडेशनच्या रजनीताई ताठे आदींसह प्रगत कला महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते.

ॲड. महेश शिंदे म्हणाले की, स्वत:च्या सुरक्षिततेसह इतरांच्या सुरक्षिततेसाठी वाहतुकीचे नियम पाळणे आवश्यक आहे. अपघातात एखादा कर्ता पुरुष दगावल्यास तो संसार उघड्यावर येतो. कुटुंबीयांच्या जबाबदारीचे भान ठेवून प्रत्येकाने अपघात टाळण्यासाठी वाहतुकीचे नियम पाळण्याचे आवाहन करुन, त्यांनी वाहतुकीच्या नियमाबाबत माहिती दिली.

अनिल साळवे म्हणाले की, अपघात टाळण्यासाठी वाहतुकीचे नियम आहेत. सदर नियमाचे पालन करुन अपघाताचे प्रमाण कमी करता येणार आहे. अपघातांची दिवसंदिवस वाढत्या संख्येला वाहतुकीच्या नियमांमध्ये केलेला निष्काळजीपणा आहे. एखादा अपघात झाल्यानंतर घटनास्थळी असलेल्या नागरिकांनी जीवनदूतची भूमिका पार पाडावी. जखमींचा जीव वाचविण्यासाठी त्यांना तातडीने रुग्णालयात घेऊन जाण्याबाबत त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास नेहरू युवा केंद्राचे जिल्हा समन्वय अधिकारी संकल्प शुक्ला, सिद्धार्थ चव्हाण, रमेश गाडगे, उमेद सोशल फाऊंडेशनचे उपाध्यक्ष कुणाल तनपुरे, खजिनदार संजय निर्मळ यांचे मार्गदर्शन लाभले.


अहिल्यानगर शहरातील ठाकरे गटातील पदाधिकारी शहर प्रमुख, माजी महापौर, विद्यमान नगरसेवक, माजी नगरसेवक, पदाधिकारी या सर्वानी छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करून शिंदे गटात प्रवेश करण्यासाठी मुबईकडे रवाना झाले.

# नगर शहरात शिवसेनेच्या ठाकरे गटाला पडले मोठे खिंडार, शहरप्रमुखासह, आजी माजी पदाधिकारी, नगरसेवक शिंदे गटात प्रवेशासाठी मुबईकडे रवाना

नगर – नगर महापालिकेत आज पर्यंत सर्वात जास्त नगरसेवक, चार महापौर असलेल्या ठाकरे गटाला मात्र आता मोठे खिंडार पडले आहे. ठाकरे गटातील पदाधिकारी यांचा ३० जानेवारीला सायंकाळी मुबई येथे शिंदे गटात जाहीर प्रवेश होणार असून त्यासाठी सकाळीच विद्यमान शहर प्रमुख, माजी महापौर, नगरसेवक, पदाधिकारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करून मुबईकडे रवाना झाले.

यावेळी शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, संपर्कप्रमुख दिलीप सातपुते, शहर प्रमुख सचिन जाधव, बाबूशेठ टायरवाले, रणजित परदेशी, रोहित लोखंडे, योगेश गलांडे, अक्षय कातोरे आदी यावेळी उपस्थित होते.

ठाकरे गटाचे शहर प्रमुख संभाजी कदम, माजी महापौर संजय शेडगे, नगरसेवक बाळासाहेब बोराटे, गणेश कवडे, दत्ता कावरे, सचिन शिंदे, शाम नळकांडे, परेश लोखंडे, संतोष गेनपा, संग्राम कोतकर, बबलू शिंदे, विजय पठारे, आदींसह माजी नगरसेवक सुरेश तिवारी, उपशहर प्रमुख संदीप दातरंगे, अरुण झेंडे, रमेश खेडकर, अभिजित अष्टेकर, बंटी खैरे, कैलास शिंदे, संतोष तनपुरे, प्रवीण बेद्रे, चेतन शिरसुल, अण्णा घोलप, सागर थोरात, अभिजित दहिहंडे, अनिकेत आरडे, असिफ पटवेकर, ॲड. सतीश गीते आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिंदे गटात प्रवेश करणार आहेत.

# काळ्या काचा असणाऱ्या वाहनांवर कारवाई

**नगर शहरात राबविली मोहिम, वाहन चालकांकडून दंड वसूल**



नगर – शहरात वाढत्या वाहतूक शिस्तभंगाच्या घटना रोखण्यासाठी आणि वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी नगर शहर पोलिसांनी चारचाकी वाहनांवर असलेल्या काळ्या काचा (ब्लॅक फिल्म) हटवण्याची विशेष मोहीम हाती घेतली आहे. २८ जानेवारीला सायंकाळी पोलिसांनी ठिकठिकाणी केलेल्या नाकाबंदीदरम्यान ९० वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. दरम्यान, २९ जानेवारीला सायंकाळी देखील शहर पोलिसांनी नाकाबंदी करून कारवाई सुरू केली होती. रात्री उशिरापर्यंत ही कारवाई सुरू होती.

शहर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या आदेशानुसार, मंगळवारी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, कायनेटिक चौक, प्रोफेसर चौक आणि भिंगार नाला या ठिकाणी नाकाबंदी करून तपासणी मोहीम राबवण्यात आली. या कारवाईदरम्यान काळ्या काचा वापरणाऱ्या वाहनचालकांवर तात्काळ कारवाई करत त्यांच्या वाहनांवरील ब्लॅक फिल्म जागच्या जागी काढण्यात आल्या. कोतवाली पोलिसांनी ३६ वाहने, तोफखाना पोलिसांनी २७ वाहने, भिंगार कॅम्प पोलिसांनी १२ वाहने तर शहर वाहतूक शाखेच्या पोलिसांनी १५ वाहनांवर कारवाई केली.

पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली कोतवालीचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, तोफखान्याचे निरीक्षक आनंद कोकरे, शहर वाहतूक शाखेचे निरीक्षक बाबासाहेब बोरसे आणि भिंगार कॅम्पचे सहायक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अंमलदारांनी ही कारवाई केली.


महेश नागरी पतसंस्थेच्यावतीने सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल येथील नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करताना संचालक.

# सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा ‘महेश नागरी’त सत्कार

नगर – भिंगार मधील महेश नागरी सहकारी पतसंस्था यांच्या मुख्य कार्यालयामध्ये नुकत्याच झालेल्या निवडणुकीत सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्थेचे नुतन चेअरमन समीर बोरा व व्हा. चेअरमन अभय पितळे यांचा सत्कार संचालक व कर्मचाऱ्यांच्या वतीने करण्यात आला. दोन्हीही पतसंस्थेचे चेअरमन व व्हा.चेअरमन यांनी पुढील भावी काळात येणाऱ्या अडचणींना मात करण्यासाठी एकमेकांना मदत करु असे सांगितले. महेश पतसंस्थेचे चेअरमन डॉ. अशोक शांतीलाल चंगेडे यांनी समीर बोरा यांचा सत्कार केला तर व्हा. चेअरमन शांतीलाल मुनोत यांनी अभय पितळे यांचा सत्कार केला.


सत्कार प्रसंगी चेअरमन डॉ. अशोक चंगेडे, व्हा. चेअरमन शांतीलाल मुनोत, संस्थेचे संचालक सुंदरलाल भंडारी, प्रकाश चोरडिया, संजय सपकाळ, कांतीलाल बोरा, विनोद भंडारी, नितीन शिंगवी, पवन गुंदेचा, संजय (सनी) मुनोत, सुदाम गांधले, मारुती पवार, किरण पतके संचालिका सौ. वैशाली बोरा, सौ. शिंगवी अंजली तसेच संस्थेचे व्यवस्थापक राजेंद्र मेहेर व संस्थेचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## कंत्राटी स्वरुपातील पदांसाठी ५ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करावेत

नगर – जिल्हा बाल संरक्षण कक्षातील बालकल्याण समिती व बालन्याय मंडळ येथे डाटा ऑपरेटर एक पद व चाईल्ड हेल्पलाईन येथे केस वर्करच्या दोन पदांची दोन महिन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटी व तात्पुरत्या स्वरुपातील भरती करण्यात येणार आहे. इच्छुकांनी ५ फेब्रुवारीपर्यंत आवश्यक त्या कागदपत्रांसह जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय अहिल्यानगर येथे अर्ज सादर करावेत.

# कस्मै देवाय हविषा विधेम?

**(अमरतिथी २०२५ च्या निमित्ताने)**



अगदी न मागता देखील सक्तीने मिळालेल्या पोटातील भुकेचा अग्नि शमविण्याकरिता काही ना काही खटपट करणे, हे प्रत्येक प्राण्याला क्रमप्राप्तच असते. मग सृष्टीच्या या अटळ नियमाला, स्वतःला ‘सामाजिक’ असे संबोधून एकीकडे स्वतःच स्वतःची पाठ थोपटून घेणारा आणि दुसरीकडे संपूर्ण जगाचा अनेक वेळा समूळ नायनाट होऊ शकेल, इतकी महाभयंकर शस्त्रास्त्रे तयार करणारा, मनुष्य नावाचा प्राणी देखील कसा काय अपवाद असू शकेल? परंतु, केवळ अन्नाने समाधान होईल, तो मनुष्य कसला?

जीवन जगण्याची अबोध अभिलाषा प्राण्यांमध्ये निवास करत असते. मनुष्याला मात्र या अभिलाषेचा बोध झालेला असतो. केवळ जीवन जगून चालणार नाही, तर ते सुखी, समाधानी आणि सुरक्षित असावे, अशी प्रत्येक मनुष्याची अपेक्षा असते व ही अपेक्षा पूर्ण होण्यासाठी तो स्वतःला जमेल तितका जास्तीत जास्त चांगला प्रयत्न करत असतो. परंतु, असा प्रयत्न करून देखील जेव्हा या वरील गोष्टींची पूर्तता होत नाही, तेव्हा असा हताश आणि अगतिक झालेला मनुष्य आपला मोहरा ईश्वर अथवा देवतांकडे वळवतो. समाजात पूजनीय अथवा उपास्य असणाऱ्या अनेक देवतांपैकी नेमकी कोणती देवता आपले कल्याण करेल, असा प्रश्नही त्याला पडतो. भौतिक सुख गवताच्या काडीप्रमाणे तुच्छ मानून, निबिड अरण्यात सृष्टीचे रहस्य जाणून घेण्यासाठी एकांतात तपस्या करणाऱ्या आपल्या द्रष्ट्या ऋषिमुनींना देखील, पुढील प्रश्न पडला – कस्मै देवाय हविषा विधेम? (अर्थात– अशा कोणत्या देवतेची आम्ही हवि अर्पण करून उपासना करावी?)

संस्कृत भाषेमध्ये ‘दिव्’ हा मूळ धातु आहे. त्याच्या अनेक अर्थांपैकी ‘चमकणे’ हा अर्थ अधिक प्रचलित आहे. या ‘दिव्’ धातुपासूनच दिवस, दिवा, देवता असे शब्द तयार झाले असावेत, असे काही विद्वानांचे मत आहे. त्यामुळे, ‘देवता’ या शब्दाचा अर्थ ‘चमकणारा’ असा होतो. सूर्य स्वयंप्रकाशाने आणि ग्रह सूर्याचा प्रकाश परिवर्तित करून चमकतात. त्यामुळेच त्यांना ‘देवतान असे म्हटले जात असावे, असे काही विद्वानांचे मत आहे. आधुनिक वैज्ञानिक परिभाषेत जरी सूर्याला ताऱ्याचा दर्जा मिळालेला असला, तरी, पारंपरिक ज्योतिष शास्त्रामध्ये सूर्याला देखील ग्रहांचाच दर्जा आहे. ग्रहांची देखील प्राणप्रतिष्ठा होत असवे त त्यांची देखील मंदिरे असतात. त्यामुळे, ग्रह हेच देवता असतात, असे मानायला निश्चितच वाव आहे.

काहींच्या मते, ग्रह आणि देवता यांचा परस्परांशी काहीही संबंध नसतो, व त्यांची कार्येदेखील भिन्न भिन्न असतात. याउलट, काही विद्वानांच्या मते, प्रत्येक देवता ही अनिवार्यपणे ग्रहच असते. त्यांच्या मते, बारा ग्रहांच्या (युरेनस, नेपच्यून, प्लुटो सहीत) बारा प्रकारच्या स्पंदनांवर साधक अथवा उपासक आपल्या साधनेच्या अथवा उपासनेच्या द्वारे प्रभुत्व मिळवितात व त्यांनाच ‘ग्रहदेवता’ अथवा ‘देवता’ असे पद प्राप्त होते. कालांतराने ते सेवेतून निवृत्त होतात व त्यांची जागा इतर मंडळींकडून भरली जाते. त्यामुळेच, ग्रह जरी बारा असले तरी, देवतांची संख्या मात्र जगभरात शेकडोंमध्ये आहे. महर्षि पाराशर यांनी देखील ग्रहांचा संबंध देवतांशी असल्याचे मान्य केलेले आहे. एका सुप्रसिद्ध सद्गुरुंचे एक वचन आहे–

**भिन्न ही दैवते यंत्रापरी होती । कामे ती करती आपुलाली ।।**
**साखरेचे यंत्र विणीना ते वस्त्र । ठाऊक हे शास्त्र तुम्हां आहे ।।**

वरील वचनाशी मी पूर्णपणे सहमत आहे. जर, आत्मसाक्षात्कार अथवा पुनर्जन्मापासून कायमची सुटका करून देणारा तथाकथित ‘मोक्ष’ प्रदान करणारी एखादी देवता असेल तर, त्या देवतेच्या उपासनेने, उपासकाला आत्मसाक्षात्कार अथवा तथाकथित ‘मोक्ष’ मिळू शकेल. परंतु, जर एखादी देवता या कार्याशी संबंधीत नसेल, तर मात्र त्या देवतेच्या उपासनेने त्या उपासकाला आत्मसाक्षात्कार अथवा तथाकथित ‘मोक्ष’ कदापीही मिळणार नाही. करुणेचे महासागर अवतार मेहेरबाबा यांनी सर्वांना निराकार ईश्वराचे ध्यान करावयाचे की देवतांची उपासना करावयाची, हे ठरविण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिलेले आहे.

राहू आणि केतू हे दोन्ही खगोलीय पिंड नसून छेदबिंदू/लुनार नोड्स आहेत. त्यामुळे ते चमकत नाहीत. परंतु, त्यांचा परिणाम मात्र नक्कीच होत असतो. म्हणजे, ते आपल्या कर्तृत्वाच्या तेजाने चमकतच असतात. म्हणून त्यांना देखील ग्रह देवतांचा दर्जा मिळालेला आहे. त्यांचे चांगले फळ मिळणार की वाईट, हे आपल्या कुंडलीवरून ठरत असते.

प्लुटो या ग्रहाची वैज्ञानिकांनी ग्रह पदावरून हकालपट्टी जरी केलेली असली, तरी त्याचे परिणाम स्पष्टपणे दिसून येतात. त्यामुळे, त्याला सुद्धा देवतेचाच दर्जा मिळालेला आहे.

युरेनस, नेपच्यून आणि प्लुटो या ग्रहांना महाभारत काळात अनुक्रमे श्वेत, शाम आणि तीव्र या नावांनी ओळखले जात असे या मताशी काही विद्वान सहमत आहेत. सर्वांना ‘अमरतिथी, २०२५’ च्या निमित्ताने हार्दिक शुभेच्छा! जय बाबा!! –**ऋषिकेश गोडसे**, नगर

